मे .यझदानी इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड, सातवा मजला, सी-विंग, फॉर्च्युन टॉवर्स, चंद्रशेखरपूर, भुवनेश्वर-७५१०२३, ओडिशा या कंपनीव्दारे प्रस्तावित मार्की मांगली-II, ओपनकास्ट कोळसा खाण प्रकल्प सावली, रुईकोट, मुकुटबन आणि पारडी, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र येथे एकूण ३३९.४६७ हेक्टर क्षेत्रात एकूण ०.३० दशलक्ष टन प्रतिवर्ष मानक उत्पादन क्षमता ०.४५दशलक्ष टन प्रतिवर्ष सर्वोच्च उत्पादन क्षमतेच्या खुल्या कोळसा खाणप्रकल्पाच्या प्रस्तावाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत -

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | १५/०५/२०२३ |
| वेळ | : | सकाळी ११:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ - मे. मार्की मांगली-II, ओपनकास्ट कोळसा खाण प्रकल्प, सेक्युरिटी पोस्ट, रुईकोट, तालुका - झरीजामणी, जिल्हा-यवतमाळ, महाराष्ट्र |

प्रस्तावना:-

मे. यझदानी इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड, सातवा मजला, सी-विंग, फॉर्च्यून टॉवर्स, चंद्रशेखरपूर, भुवनेश्वर-751023, ओडिशा या कंपनीव्दारे प्रस्तावित मार्की मांगली-II ओपनकास्ट कोळसा खाण प्रकल्प सावली, रुईकोट, मुकुटबन आणि पारडी, तालुका झरी जामणी, जिल्हा- यवतमाळ, महाराष्ट्र येथे एकूण 339.467 हेक्टर क्षेत्रात एकूण 0.30 दशलक्ष टन प्रतिवर्ष मानक उत्पादन क्षमता 0.45 दशलक्ष टन प्रतिवर्ष सर्वोच्च क्षमतेच्या खुल्या कोळसा खाणीच्या व त्याअंतर्गत ओव्हरबर्डन वाळू निर्मिती 3000 $m^3$/day आणि 5 मेगावॅट क्षमतेचा सौरऊर्जा प्रकल्पाच्या उभारणी प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील 10.0 किमी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी भारत सरकारच्या पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालय नवी दिल्ली च्या पर्यावरण प्रभाव मुल्यांकन अधिसूचना 2006 अनुसार तयार करण्यात यावी. महाराष्ट्र राज्यस्तरीय पर्यावरण प्रभाव मुल्यांकन प्राधिकरण महाराष्ट्र ने या प्रकल्पाला पत्र क्रं. SIA/MH/MIN/78839/2022, दिनांक 30/09/2022 द्वारे TOR मंजूर करण्यात आला आहे.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना 2006 नुसार प्रकल्प स्थानाच्या 10 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर स्थानिक लोक यांनी प्रस्तावित जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतीम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले तसेच सदर प्रकल्प हा संवर्ग ब मध्ये मोडत असून पर्यावरण अनुमती ही राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण / राज्यस्तरीय आघात मुल्यांकन समिती (SEIAA / SEAC), पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्याकडून प्राप्त करणे आवश्यक आहे .

प्रकल्प प्रवर्तक मे. यझदानी इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड, सातवा मजला, सी-विंग, फॉर्च्यून टॉवर्स, चंद्रशेखरपूर, भुवनेश्वर- 751023, ओडिशा यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक 18.01.2023 रोजी अर्ज सादर केला, म. प्र. नि. मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी यवतमाळ यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी यवतमाळ महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक 15 मे 2023, रोजी सकाळी 11:00 वाजता प्रत्यक्ष (Physical) आणि पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यास मान्यता दिली त्याचप्रमाणे सदरहू जनसुनावणी ऑनलाईन घेण्याचीही सूचना केली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, 2006 नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या 30 दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय म. प्र. नि. मंडळ चंद्रपूर यांनी राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया नागपूर यात इंग्रजीत दिनांक 13/04/2023 रोजी व स्थानिक वृत्तपत्र लोकमत नागपूर एडिशन, यात मराठीत दि. 14/04/2023 रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात ऑनलाईन जनसुनावणीसाठीचा बैठक नंबर व बैठक पासवर्ड उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी पर्यावरणविषयक कार्यरत संस्था सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द, झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी या ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते. त्यानुसार उप प्रादेशिक कार्यालय चंद्रपूर यांनी एक लेखी आक्षेप प्राप्त झालेला आहे.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, इंदिरा पर्यावरण भवन, जोरबाघ रोड, नवी दिल्ली- 110003.
२) सह-संचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पाईंट, 2 रा व 4 था माळा, सिनेप्लानेट सिनेमा समोर, सायन सर्कल जवळ (पु) मुंबई - 400 022
३) प्रादेशीक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
४) उप-प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रोड, चंद्रपूर.
५) जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ.
६) जिल्हा परिषद, यवतमाळ.
७) जिल्हा उद्योग केंद्र, यवतमाळ
८) उप-विभागीय कार्यालय, झरीजामणी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.

९) तहसिल कार्यालय, झरीजामणी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१०) पंचायत समिती कार्यालय, झरीजामणी, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
११) गट-ग्रामे पंचायत कार्यालय भेंडाळा (सावली, रुईकोट, पारडी व भेंडाळा), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१२) गट-ग्राम पंचायत कार्यालय मुकुटबन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१३) गट-ग्राम पंचायत कार्यालय अर्धवन, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१४) गट-ग्राम पंचायत कार्यालय पांढरकवडा, ता. केळापूर, जि. यवतमाळ.
१५) गट-ग्राम पंचायत कार्यालय मार्की बु. {मार्की (बु.) व मार्की (खु.)}, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१६) गट-ग्राम पंचायत कार्यालय खडकी (खडकी व रामपूर), ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१७) गट-ग्रामपंचायत कार्यालय गणेशपूर (बु.) {गणेशपूर (खु.) व गणेशपूर (बु.)}, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१८) गट-ग्रामपंचायत कार्यालय मांगली, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
१९) गट-ग्रामपंचायत कार्यालय पिंपराड, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
२०) गट-ग्रामपंचायत कार्यालय पवनार, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
२१) ग्रामपंचायत कार्यालय हिरापूर, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
२२) ग्रामपंचायत कार्यालय डोंगरगांव, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.
२३) ग्रामपंचायत कार्यालय कोसरगांव, ता. झरीजामणी, जि. यवतमाळ.

वरिल अनुक्रमांक ०५ ते २३ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्प स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३२/२०२३ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डब्ल्युपीसी) पीएच/बी-२३०४२६-एफटीएस-००३९ दिनांक २६/०४/२०२३ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर - **समन्वयक**

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत १७ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-२ प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री. अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री. अमोल येडगे, भा.प्र.से.,जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री. अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी

प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विंभाग, महाराष्ट्र शासन, १५ वा माळा, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मादाम कामा रस्ता, मुंबई-४०० ०३२ यांना सादर करण्यात येईल. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. या जनसुनावणीच्या इतिवृत्ताची नोंद घेण्यात येऊन ती भारत सरकारच्या पर्यावरण, वने व वातारणीय बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येईल. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

समन्वयक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले.

प्रकल्पाची माहिती अंतर्गत सादरकर्त्यांनी कळविले की, प्रस्तावित खाण योजनेत ०.३० दशलक्ष टन प्रतिवर्ष मानक उत्पादन क्षमता आणि ३३९.४६७ हेक्टर खाण लीज क्षेत्रामध्ये ०.४५ दशलक्ष टन प्रतिवर्ष सर्वोच्च उत्पादन क्षमता संकल्पित आहे. कोळसा काढण्यासाठी सरफेस मायनर आणि ओव्हरबर्डन काढून टाकण्यासाठी शॉवेल/डंपर संयुक्तपणे वापरून मेकॅनाइज्ड ओपनकास्ट मायनिंग पद्धतीद्वारे प्रकल्पाचे काम प्रस्तावित केले आहे. संकल्पित प्रकल्प भांडवली खर्च रू. १८९.८९ कोटी आहे.

प्रकल्पासाठी एकूण ३३९.४६७ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे, त्यापैकी महसूल वन १४६.९९६ हेक्टर, खाजगी जमीन १८५.०४ हेक्टर आणि अशासकीय भूमी ७.४३ हेक्टर आहे. १४६.९९६ हेक्टर आहे. वनजमीन अधिग्रहणासाठी आवश्यक अर्ज २०/०५/२०२२ रोजी वन विभागास सादर केला गेला आणि आणि सक्रिय विचाराधीन आहे. खाजगी जमीन ग्राम सावली ४.७१२ हेक्टर, रूईकोट १६५.०३७ हेक्टर, मुकुटबन १५.२९२ हेक्टर प्रस्तावित आहे. तसेच ग्राम पार्डी येथील खाजगी जमीन प्रकल्पाअंतर्गत येत नाही पण वन जमीन प्रकल्पाअंतर्गत आहे. जमीनीची भरपाई भुसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना ऊचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ महाराष्ट्र राज्यास लागू असताना सुधारणा करण्यासाठी अधिनियम (क्रं. ३७, तारीख २६ एप्रिल २०१८) अंतर्गत करण्यात येईल.

वाघांच्या अभ्यास क्षेत्रात अस्तित्वांची असल्याची जाणीव असल्यामुळे कंपनीद्वारा Wildlife Mitigation Plan व Wildlife Conservation Plan वन विभागास सादर केलेला आहे. प्रकल्पामध्ये प्रकल्प क्षेत्रामध्ये कुठलीही रहिवासी वसती नसल्यामुळे गावांचे स्थलांतर करणे संमेविष्ट नाही.

या प्रकल्पात ३९ वर्षांच्या खाण आयुष्यात (बांधकाम कालावधीसह) ८७.०६ दशलक्ष घनमीटर ओव्हरबर्डन काढून ९.५८ दशलक्ष टन कोळसा काढण्याचा प्रस्ताव आहे. कोळशाचा ग्रेड G-९ आहे. ८७.०६ दशलक्ष घनमीटर ओव्हरबर्डनपैकी ७६.९९ दशलक्ष घनमीटर ओव्हरबर्डन खनन क्षेत्रामध्ये बॅकफिल करण्याचा प्रस्ताव आहे. केवळ ५१.७८ हेक्टरची अंतिम पोकळी, ज्याची खोली ३० मीटर असेल. ओपनकास्ट खाण बंद झाल्यानंतर, त्याचे जलाशयात रूपांतर केले जाईल. मंजूर खाण अहवालानूसार कोळसा मंत्रालयाचया दृष्टीकोणाचा भाग म्हणून, ओव्हरबर्डचा फायदेशीर वापर, जसे बांधकाम प्रकल्पांमध्ये वापरण्यासाठी वाळू उत्खननाद्वारे शाश्वत रीतीने OB चा पुनर्वापर आणि समर्पक करण्यास सुचविले आहे आणि त्याद्वारे नदीपात्रातील वाळू उत्खनन प्रतिबंधित केले आहे. त्यामुळे बाह्य डंपमध्ये साचलेल्या ओव्हरबर्डनला वाळू तयार करण्यासाठी क्रशिंग युनिटमध्ये बारीक केले जाईल व त्याचा वापर बांधकाम उद्योगात वाळूच्या स्वरूपात करण्याचा प्रस्तावदेखील अंतर्भूत करण्यात आला आहे. प्रस्तावित वाळू क्रशिंग युनिट खनन पट्टा क्षेत्रामध्ये प्रस्थापित करण्यात येईल. तसेच शाश्वत उपक्रम म्हणून देय परवानग्या मिळाल्यानंतर बॅकफिल केलेल्या जागेवर सुरूवातील ५ मेगावॅटचा सौरऊर्जा प्रकल्प उभारण्याचा प्रस्ताव आहे.

सदर खनन प्रकल्पामुळेदेखील २५० लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल. या व्यतिरिक्त अंदाजे ५० लोकांना प्रस्तावित वाळू क्रशिंग व सौरऊर्जा प्रकल्पाअंतर्गत रोजगार उपलब्ध होईल आणि अप्रत्यक्षपणे रोजगाराच्या संधी निर्माण होतील. स्थानिक व्यक्तिंना त्यांच्या पात्रतेनूसार नोकरीत प्राधान्या दिले जाईल.

माहिती आणि पुरूषांसह स्थानिक लोकांना त्यांच्या पात्रतेनूसार नोकरीत प्राधान्य दिले जाईल व इच्छूक पुरूष आणि महिलांसह बेरोजगार तरूणांना आवश्यक प्रशिक्षण दिले जाईल. या प्रदेशात प्रकल्प पुन्हा सुरू झाल्यानंतर अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी आपोआपच निर्माण होतील.

प्रकल्पाची पाण्याची आवश्यकता सुरूवातील ४२६ घनलिटर प्रति दिवस असण्याचा अंदाज आहे आणि अंतिम चरणात तो ९२२ घनलिटर प्रति दिवस असण्याचा अंदाज आहे. यापैकी धुळ निरोधकतेसाठी १५० घनलिटर प्रति दिवस, ग्रीन बेल्टसाठी ६४८ घनलिटर प्रति दिवस, कार्यशाळा आणि इतर उपक्रमांसाठी ११२ घनलिटर प्रति दिवस आणि शिल्लक १२ घनलिटर प्रति दिवस पिण्यासाठी/घरगुती प्रयोजनासाठी आवश्यक आहे. भुगर्भातील पाण्यापासून बोअरवेलद्वारे घरगुती पाणी मिळवले जाईल ज्यासाठी आवश्यक मंजूरी प्राप्त केली जाईल. औद्योगिक वापरासाठी पाणी हे साचलेल्या खड्ड्यातील पाणी आणि पावसाच्या पाण्याद्वारे प्राप्त केले जाईल ज्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्याकडून मंजूरीसाठी आवश्यक अर्जही करण्यात आला आहे.

सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः -

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ,रेखांश-अक्षांश ,नकाशा ,खनन क्षेत्र,वन क्षेत्र ,लाभक्षेत्र ,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,भूकंप स्थिरता ,जमीन वापर ,परिणाम ,महत्व प्रकल्पाचे,
- प्रकल्पाचा उद्देश ,रोजगाराची संधि ,सामाजिक स्थिती ,शेतकऱ्यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषणनिष्कर्ष ,सारांश ,
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा,बाबतची माहिती.विस्थापन इ ,ध्वनी ,जमीन ,पाणी ,
- नियोजित प्रकल्पामुळे हवाजैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन,विस्थापन,पाणी,
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

समन्वयक यांनी उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार , ,टीकाटिप्पणीसूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केलेसदरहू जनसुनावणी . आक्षेप ,ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना .नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना सांगितले की ही पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे. उपस्थितांनी मत मांडताना एकदाच मत मांडावयाचे आहे. सूचना, आक्षेप नोंदविताना मुद्देसूद सांगाव्यात. तेच तेच बोलू नये. वेळेची मर्यादा आहे. उपस्थितांनी मुद्दा मांडल्यानंतर प्रकल्प प्रवर्तक त्यांची भूमिका स्पष्ट करतील..

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्नसूचना तसेच प्रकल्प ,आक्षेप ,टीकाटिप्पणी , पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली /पर्यावरण सल्लागार/प्रवर्तक -आश्वासने खालीलप्रमाणेः/उत्तरे**

**१) श्री. रविंद्र सुधाकर पुल्लीवार, राहणार-रुईकोट, तालुका झरी जामणी, जिल्हायवतमाळ.**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येझदानी कंपनी ही नविन आहे.त्याअगोदर विरंगना कंपनी होती.रुईकोट हे गाव कंपनीला लागूनच आहे. रुईकोटच्या सर्व शेत्या ह्या कंपनी प्रकल्पातच आहेत.कोळसा कंपनीच्या मालकाला एक एकरमध्ये | प्रकल्पाचे अधिकारी यांनी सांगितले की उपस्थितानी त्यांना अपेक्षित असलेला जमिनीच दर सांगितला.मात्र प्रकल्प प्रवर्तकाचा जमीन अधिग्रहण कायदा, २०१३ |

| | | |
|---|---|---|
| | सुमारे २६ कोटी १२ हजार सातशे, चिल्लर पैसे काहीतरी मिळतात. कोळसा काढण्यासाठी सुमारे ९ कोटी खर्च येतो. शेतकऱ्यांना काहीच मिळत नाही.आता शेतजमिनी मिळतच नाही. तरी आता उरलेली शेती कंपनीने विकत घ्यावी.एका गटाला वीस लक्ष रुपये कंपनीने द्यावेत. एक गट म्हणजे पाच एकर किंवा दोन एकर, तीस लाख रुपये एक एकरचे, असे मिळून पन्नास लक्ष रुपये कंपनीने द्यावेत, माझ्या मुलाला प्रकल्पात नोकरी देण्यात यावी. तसेच कंपनीला लागूनच रुईकोट गांव असल्याने ते विकत घ्यावे. | च्या तरतुदीनुसार विकत घेण्याचा आमचा मानस आहे. |

२) **श्री. अनिल कुटा,उपसरपंच,मुकुटबन ग्रामपंचायत, तालुका झरी जामणी, जिल्हा- यवतमाळ, रुईकोट प्रकल्पग्रस्त -**

मी सर्व प्रकल्पग्रस्तांतर्फे बोलत आहे:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | माईन्स क्षेत्रातील संपूर्ण जमीन एकमुष्त खरेदी /एकत्र खरेदी करुनच नंतर उत्खनन/प्रकल्प सुरु करण्यात यावा, | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की उपस्थित श्री अनिल कुटा यांनी सूचना केली की कंपनीने जमिन एकमुष्त घ्यावी. तर कायद्याच्या आधारे एकमुष्त जमिन घेतली जाते.. त्यामुळे प्रकल्प तुकड्या तुकड्याने (piece meal) जमिन विकत घेणार नाही. आम्ही एकमुष्तच जमिन विकत घेणार आहे. |
| २) | सर्वसाधारणपणे एकरी ५० लाख याप्रमाणे जमिन खरेदी करण्यात यावी, | जमिन अधिग्रहण कायदा, २०१३ च्या नुसार जमिन अधिग्रहण करण्यात येईल. |
| ३) | प्रकल्पग्रस्तांच्या मुला-मुलींना त्याची शैक्षणिक अहर्तेनुसार प्रकल्पातर्फे प्रशिक्षण देण्यात येऊन प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात यावी | मागणी रास्त आहे. आम्ही स्थानिक युवक युवतींनाच प्रकल्पात रोजगाराची संधि देणार आहोत. स्थानिकांची निवड झाल्यानंतर आम्ही त्यास प्रशिक्षण देऊन रोजगॉरक्षम (Employable) म्हणून तयार करुन त्यांनाच प्रकल्पात प्राधान्य देणार. माईन्स सुरु होण्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | अगोदर आम्ही काही लोकांना प्रशिक्षण दिलेले आहे. ते येथे उपस्थित असतील. यासाठी प्रकल्प प्रवर्तक या मागणीच्या समर्थन करतो. |
| ४) | कंपनीतील विविध सेवा/कामे देण्याच्यावेळी प्रकल्पग्रस्त व स्थानिकांनाच प्राधान्य देण्यात यावे,उदा- कॅन्टीन चालविणे, वाहनांची सेवा पुरविणे, सुरक्षारक्षक, कंपनीतील विविध कामे- प्लबिंग,वीजेचा कामे,सुतारकामे इ. | सूचना चांगली असून त्यावर अंमलबजावणी करण्यात येईल. |
| ५) | कंपनीतील कामगारांकडून आठ तासापेक्षा काम करुन घेऊ नये. कामात एक तास सुट्टी देण्यात यावी. आठवड्यात एक दिवस सुट्टी देण्यात यावी. येथील अनेक कारखान्यात बारा तास काम करुन घेतात. | कामगारांना कुठलेही अतिरिक्त काम देणार नाही. लेबर लॉ नुसारच कामे देण्यात येतील. |
| ६) | जड वाहतुक ही निर्धारित वेळेतच करण्यात यावी. मुकुटबनचा दर सोमवारी बाजार असतो. त्यावेळी कंपनीने ग्रामपंचायतीस विश्वासात घ्यावी. | वाहतुकीचे सर्व नियम पाळण्यात येतील. गावाजवळ २-३ व्यक्ती वाहतुकीस दिशा दाखविण्यासाठी ठेवण्यात येतील. |
| ७) | भूसंपादित शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीत बोअरवेल, कंपाऊंड व्रॉल, फळबागा असतील, तर त्याचाही मोबदला शेती विकत घेत असताना देण्यात यावा. | शेतीमध्ये इतर घर विहिर असेल तर कायद्यनुसार ते समाविष्ट करण्यात येईल.त्याचा मोबदला अतिरिक्त मोबदला दिला जाईल. |
| ८) | एक खरेदीचा आकाडा सांगण्यात यावा | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की जमिनीचा दर ठरविण्याचा अधिकार आम्हांला नाही. तो दर जमीन अधिग्रहण कायदा , 2013 नुसार विचारात घेतला जाईल . त्यांनी सांगितले की ही जरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असली तर फक्त जमिनीबाबतची जाहिर जनसुनावणी घेण्यात येईल, तशी कायद्यात तरतुद आहे. |

अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केली की बैठकीत सांगण्यात आलेल्या मुद्दे परत न बोलता इतर मुद्यांवर चर्चा करण्यात यावी.

**३) श्री. राजेश बेले, संस्थापक अध्यक्ष, संजिवनी पर्यावरण सामाजीक संस्था, चंद्रपूर:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात सादर केलेला आहेत. अहवालात असे नमुद केलेले आहे की सदरहू प्रकल्पासाठी | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की सदरहू बैठक ही प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरणविषयक जाहिर |

| | | |
|---|---|---|
| | जमिन अधिग्रहणाची आवश्यकता आहे महसूल वन जमिन १४६.९९६ हेक्टर दर्शविण्यात आलेली आहे. ह्या जमिनीवर जिल्ह्यातील नागरिकांचा अधिकार आहे. याचा जो महसुल जमा होईल, तो येथेच खर्च करण्यात यावा यासाठी शासनाने नियमावली तयार करावी. तालुक्यानुसार खर्चाचा आराखडा तयार करण्यात यावा. सदरहू प्रश्न हा मा. जिल्हाधिकारी यांना विचारण्यात आलेला आहे. | जनसुनावणी असून जे प्रश्न विचारण्यात येतील, ते प्रकल्पधारकास असतील व प्रकल्पधारक / प्रकल्प प्रवर्तक प्रश्नांना उत्तर देतील. सर्व सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येऊन शासनास सादर करण्यात येईल. त्याबाबत शासन निर्णय घेईल. तरी प्रकल्प प्रवर्तकांना प्रश्न विचारण्यात यावेत. |
| २) | पर्यावरणाशी संबंधित जे वन आहे, वृक्ष आहेत, जे या जमिनीवर लावलेले आहेत. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की चार लाख वृक्ष लावण्यात येतील. तरी वन विभागातर्फे येथील वृक्षांची गणना करुन किती वृक्ष संख्येनी आहेत ते ठरवावे, एक वृक्ष तोडला तर त्याच्या बदलात दहा वृक्ष लावणे हा पर्यावरण नियमात व वन नियमात तशी तरतुद आहे. त्यानुसार वृक्ष लागवड करावी. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की झाडांची गणना करण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आलेले होते. तर वृक्षाची गणना झालेली असून १४७ हेक्टरच्या वनक्षेत्रात १,१३,४२५ (एक लाख तेरा हजार चारशे पंचवीस) झाडे आहेत. तर १,१३,४२५ (एक लाख तेरा हजार चारशे पंचवीस) झाडे या कंपनीव्दारे काढण्यात येणार नाही. कारण ७.५ मीटरचा सुरक्षा क्षेत्र (Safety Zone) असतो, ती झाडे काढता येत नाहीत. त्यांना तसेच शाबूत ठेवण्यात येईल. तर ज्या भागात excavation area आहे, तेवढीच झाडे काढण्यात येतील. म्हणजे जास्तीतजास्त ७०% झाडे काढण्यात येतील. तीस टक्के झाडे तेथेच असतील. तर त्यासाठी चार लाख झाडे लावण्यात येतील.त्याचप्रमाणे पर्यायी वनक्षेत्रातील जमीन संवर्धन करावी लागते. यवतमाळ जिल्ह्यातच १४७ हेक्टर पर्यायी वनक्षेत्र शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. याकरिता कंपनीद्वारे मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांना अर्ज करण्यात आला होता परंतु यवतमाळ जिल्ह्यात १४७ हेक्टर पर्यायी वनक्षेत्र उपलब्ध नसल्याचे जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे कळविण्यात आले. त्यामुळे आपल्या राज्यातील दुसऱ्या जिल्ह्यात तेवढीच जमिन घ्यावी लागली. तर १५०० झाडांच्या प्रति हेक्टरप्रमाणे वृक्षारोपण करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रकल्प प्रवर्तकांनी $PM_{१०}$, $PM_{२.५}$ याची माहिती नमुद केलेली आहे, ती पूर्णपणे खोटे आहेत. माझ्याकडील आकडेवारी खालीलप्रमाणे आहे:- $PM_{१०}$ - ४१२, ११८, १२१, २१९, १४७ हा परिसरातील हवा गुणवत्ता इंडेक्स आहे.<br>तर प्रकल्प प्रवर्तकांनी अहवालात दिलेले आहेत – ४४.८, ६०.६४ ही खोटा दिलेला आहे. | पर्यावरण सल्लागार यांनी पुढे सांगितले की, आम्ही $PM_{१०}$ व $PM_{२.५}$ चे मॉनिटरिंग हे २४ तासाचे आहे. हवा गुणवत्ता इंडेक्स (Air Quality Index) ही ४-५ पॅरामिटरला घेऊनच मोजमाप करण्यात येते. |
| ४) | तसेच येथील तापमान हे ४५°C - ४६°C एवढे असते. तर येथील तापमानही खोटे दाखविण्यात आलेले आहे. | पुढील मुद्दा तापमान वाढीबाबत. तर आम्ही जेव्हा तापमानाची नोंद घेतली, त्यावेळी जास्तीतजास्त ४५.२°C तापमान नोंदविण्यात आलेले आहे. |
| ५) | त्यांनी आक्षेप नोंदविला की प्रकल्पाच्या वाहतुकीमुळे मोठया प्रमाणात प्रदूषण होणार आहे. ५० टनाचे मोठे हायवा चालणार आहेत. त्यामुळे रस्ते फुटतील, गावात प्रदूषण होईल. रस्ते फुटतील हा मुद्दा प्रकल्प अधिकारी यांनी सांगितलेला नाही. रस्ता फुटल्यास त्यास जबाबदार कोण हे त्यांनी सांगितलेले नाही. त्याचप्रमाणे रस्ते दुरुस्तीसाठी कोणताही निधी राखून ठेवण्यात आलेला नाही. | प्रकल्पाचे अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तर दिलेले आहे. रस्त्याच्या अडचणी या स्थानिकांबरोबरच इतर माईन्स असोशियन्स बरोबर आम्हीसुध्दा त्रास सहन करत असतो. त्यांनी सांगितले की मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येईल की रस्ता रुंदीकरणाचे नियोजन केल्यास आमची कंपनी इतर कंपन्यांबरोबर आर्थिक भार स्विकारेल, त्यामुळे गावक-यांचा व सर्वांचाच त्रास कमी होईल व वाहतुकीचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल. |
| ६) | तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की त्यांच्या कामगार, कर्मचारी यांच्यासाठी आरोग्य शिबिर होईल व गावक-यांसाठी वर्षातून एकदा आरोग्य शिबिर आयोजित करण्यात येईल. प्रकल्पातील प्रदूषणामुळे येथील स्थानिकांचे आरोग्य धोक्यात येईल. तरी कंपनीने एक हॉस्पिटल येथे सुरु करणे गरजेचे आहे व त्यामध्ये वैद्यकीय सुविधा ही मोफत स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली पाहिजे. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की याझदानी इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड ही ओडीशाची कंपनी आहे. त्यांनी प्रथमच आम्हांला सांगितले की शिक्षण व आरोग्य या क्षेत्रात जास्तीतजास्त काळजी घेण्यात यावी. येथे काही दिवसात आंतरराष्ट्रीय दर्जाची शाळा पाहायला मिळेल. ही हमी आहे. आरोग्याबाबत येथील जेवढी सेवा सक्षम व सशक्तीकरण करता येईल, तेवढी आम्ही करणार आहोत. जर अत्याधुनिक हॉस्पिटल बांधण्याची संधी मिळाली, तर ती निश्चितच पूर्ण करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ७) | प्रकल्पामुळे प्रदूषण वाढेल, त्यासाठी अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रकल्पात कार्यान्वित करण्यात येऊन प्रदूषण हे कमी करावे. | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात अत्याधुनिक प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे रस्त्यावर वेळोवेळी पाणी शिंपडण्यात येईल. |
| ८) | प्रकल्पामुळे फक्त कंपनीच्या आवारातील भूजल कमी होणार नाही, तर आजूबाजूच्या भागातीलसुध्दा भूजल पातळी कमी होणार आहे. तरी त्यासाठी कंपनीने उपाययोजना करण्याची जबाबदारी ही कंपनीने घ्यावी. | भूजल पातळीबाबत प्रश्न विचारण्यात आला. तर आम्हांला माहित आहे की ही माईन्स १२५ मीटर्स खोल जाणार आहे. त्यामुळे येथील भूजलाचा साठा ही नक्कीच कमी होणार आहे. पाण्याची पातळी ही परिसरातील नक्कीच कमी होणार. त्यासाठी आजूबाजूच्या गावात Water Security Plan कंपनी देणार आहे. गावातील लोकांना पिण्यासाठी, घरगुती वापरासाठी, पशुधन धुण्यासाठी, जनावरांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. |

४) श्री. चंद्रकांत घुगुल, तालुका शिवसेना प्रमुख, मुकुटबन, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास विनंती आहे की झरी झामनी तालुक्यात ८-१० कंपन्या, चुनाभट्टया, खाणी कार्यरत आहेत. तालुक्यात धुळीचे प्रदूषण वाढलेले आहे. कित्येक ट्रक्स हे ओव्हरलोड असतात. रस्त्याची क्षमता एवढी ट्रक्स वाहून नेण्याची नाही. धुळीवर पाणी मारत नाहीत. मुकुटबन येथील शेतकरी धुळीच्या प्रदूषणामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या पीकांची नासाडी झाली. वर्ष जाऊनही त्यांना काहीही मोबदला मिळालेला नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात Online Continuous Monitoring System कार्यान्वित करण्यात येईल. त्यामुळे प्रकल्पातील हवेच्या गुणवत्तेची माहिती आपल्याला सतत मिळेल. त्याचप्रमाणे वेळोवेळी रस्त्यावर पाणी मारण्यात येईल. |
| २) | त्यांनी आरोप केला की सादरीकरणात बऱ्याच गोष्टी चुकीच्या सांगितलेल्या आहेत. पांढरकवडा हे गांव दुसऱ्या ग्रामपंचायतीत दाखविलेले आहे. | सादरीकरणात कुठेही पांढरकवडा गावाच्या स्थळासंबंधी उल्लेख केलेला नाही. |
| ३) | त्यांनी पुढे सांगितले की येथील रस्ता हा दुपदरी आहे. दर १०-१५ दिवसात येथे एक अपघात होतोच. तरी येथे चार पदरी रस्त्याची गरज आहे. | प्रकल्पाचे अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी योग्य प्रकारे उत्तर दिलेले आहे. रस्त्याच्या |

| | | |
|---|---|---|
| | | अडचणी या स्थानिकांबरोबरच इतर माईन्स असोशियन्स बरोबर आम्हीसुध्दा त्रास सहन करत असतो. त्यांनी सांगितले की मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यातं येईल की रस्ता रुंदीकरणाचे नियोजन केल्यास आमची कंपनी इतर कंपन्यांबरोबर आर्थिक भार स्विकारेल, त्यामुळे गावक-यांचा व सर्वांचाच त्रास कमी होईल व वाहतुकीचे प्रश्न सोडविण्यास मदत होईल. |
| ४) | १४६.९९९ वन खात्याची जमिन आहे. तेथे वाघांचा अधिवास आहे. आपल्या प्रकल्पात त्याचा कोठेही उल्लेख नाही. आहे, ती प्रकल्पाने घेतल्यास जिल्ह्याचे नुकसान आहे. येथे सागवानाची झाडे आहेत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री पुराणिक यांनी वाघाचा व सागवानाचा मुद्दा मांडलेला आहे. वाघाचा उल्लेख आमच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात आलेला असून Wild Life Conservation Plan बनवायचा असतो, तो बनवून वन विभागास सादर करण्यात आलेला आहे. त्याची प्रत येथे उपलब्ध आहे. Wild Life Conservation Plan साठी आठ कोटींची तरतुद करण्यात आलेली आहे. Wild Life Conservation Plan साठी फक्त आणि फक्त वन विभागच त्यांच्या निर्देशित मानंकाप्रमाणेच कार्यवाही करु शकतो. |
| ५) | वन क्षेत्र जे प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात येईल तेथे सागवानासारखी मौल्यवान झाडे आहेत. त्या जंगलात करोडो-अब्ज रुपयांची संपत्ती आहे, त्याचा कुठेही उल्लेख अहवालात नाही. त्या संपतीचे आपण काय करणार आहात? जी वनखात्याची करोडो-अब्ज रुपयांची जमिन. | वनात सागवानच्या झाडांचा व इतर प्रजातींचा उल्लेख करण्यात आला. तर त्यासाठी Compensatory Aforestation जी प्रक्रिया आहे, त्यासाठी वनविभागाकडे अर्ज सादर करण्यात आलेला आहे. |

५) <u>सौ. मीना जगदीश अंबुरवार, सरपंच, ग्रामपंचायत, मुकुटबन, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळः-</u>

म.प्र.नि. मंडळाने आयोजित केलेल्या या पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीत मी खालील मुद्दे उपस्थित करत आहेत:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कोळसा राष्ट्रीय संपत्ती असल्याने वीजनिर्मितीसाठी आवश्यक आहे. | प्रकल्प अधिकारी यांनी आमच्याशी निगडीत असलेले प्रश्न म्हणजे, रोजगार, भूसंपादन, रस्ता, सीएसआर निधी हे जे प्रश्न आहेत, त्यांनी सांगितले की या प्रश्नांची उत्तरे पूर्वी दिलेली असून ते परत सांगण्यात येतात. |
| २) | येझदानी कंपनीने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सहमतीने जमिनीचा मोबदला देण्यात यावा व त्यांची जमिन एकमुष्त घेण्यात यावी, त्यांच्या मुला-मुलींना प्रकल्पात कायमस्वरुपी नोकरी देण्यात यावी, | जमिन एकमुष्त घेण्यात येणार आहे. प्रकल्पात स्थानिक, प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात येईल, |
| ३) | येथील एका प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना ८० दिवस धरणे आंदोलने करण्याची वेळ आली. तरीही त्यांचे प्रश्न मार्गी लागले नाहीत. अशी परिस्थिती येथे निर्माण होऊ नये. | प्रकल्पात स्थानिक, प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात येईल, |
| ४) | मागील दहा वर्षापूर्वी आरसीसीपीएल सिमेंट कंपनीने येथील शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. दहा वर्षानी कंपनी सुरु झाली. ती कंपनी दुसऱ्या कंपनीने विकत घेतली. प्रकल्प सुरु झाला, पण प्रकल्पग्रस्त व त्यांच्या वारसदारांच्या पुनर्वसनाचा प्रश्न कायम आहे. कंपनी स्थानिकांऐवजी परप्रांतीयांना नोकऱ्या देत आहे. तसा प्रकार या कंपनीत होऊ नये. | कंपनीत स्थानिक मुलांना प्रशिक्षण देऊन रोजगाराची संधि देण्यात येईल. |
| ५) | ज्याठिकाणी जमिनी खाणीत जात आहेत, त्याठिकाणी वृक्ष लागवड करण्यात यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आली. |
| ६) | कंपनीतून बाहेर पडणारा ट्रक हा गावातील रस्त्यातून न नेता परिसरातील सर्व कंपन्यांनी आपला बाय-पास मार्ग तयार करुन तेथून वाहतुक व्यवस्था करावी. त्यामुळे जनतेस त्रास होणार नाही. धूळीचा त्रास होऊ नये म्हणून वेळोवेळी पाणी मारण्यात यावे व धुळ नियंत्रण सयंत्रणा बसविण्यात यावी. | वाहतुकीबाबत बैठकीत उत्तर देण्यात आलेले आहे की मा. जिल्हाधिकारी यांना विनंती करण्यात येते की परिसरातील सर्व कंपन्या, उद्योग यांची एक बैठक बोलविण्यात येऊन रस्ता रुंदीकरणासाठी नियोजन, आर्थिक मदतीत सहभाग याबाबत पुढील तोडगा काढण्यात येईल. धुळीचा त्रास होऊ नये म्हणून वेळोवेळी पाण्याचा शिडकाव मिस्ट स्प्रे यंत्रणा बसविण्याचा प्रस्ताव अहवालात नमूद केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| ७) | कंपनीतर्फे आरोग्यसेवा, अग्नीशामक व रुग्णवाहिकेची (Ambulance) सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याचप्रमाणे सीएसआर निधी परिसरातील विकासकामांसाठी उपलब्ध करुन देण्यात यावा. | कंपनी सुरु झाल्यानंतर ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन गावात आवश्यक असणाऱ्या कामांसाठी सीएसआर निधी खर्च करण्यात येईल. त्यासाठी एक समन्वयक समिती स्थापन करण्यात येऊन त्यात सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, प्रकल्प अधिकारी यांचा समावेश असेल. |
| ८) | कोळसा क्षेत्राबाहेरिल ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी जातात, त्या शेतकऱ्यांना दरवर्षी पिकांना होणारी नुकसान भरपाई देण्यात यावी. | पीक नुकसानीचा दावा शासनाकडे केल्यानंतर शासनाच्या आदेशांनुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| ९) | आपण दिलेल्या माहितीनुसार पान क्रं.३ परिच्छेद २ नुसार २५० व्यक्तींना रोजगाराची संधि मिळणार आहे. तो फक्त स्थानिक व्यक्तींचा देण्यात यावा. | सदरहू प्रश्नाचे उतर देण्यात आलेले आहे. |
| १०) | अहवालातील माहितीनुसार दररोज ९०९ टन कोळशाची वाहतुक होईल. त्यासाठी ३६ डंपरने वाहतुक करण्यास आपण कटीबद्ध राहावे. | अहवालात दिलेल्या माहितीप्रमाणे कोळसा ५० डंपरने वाहतूक करण्याचा प्रस्ताव आहे. |
| ११) | दिलेल्या माहितीवरुन सीएसआर निधीसाठी ८९.९० लाख भांडवली असून पहिल्या पाच वर्षांसाठी दरवर्षी २०.११ लाखाची तरतुद केलेली आहे. त्यास आपण कटिबध्द असावे. | कंपनी सुरु झाल्यानंतर ग्रामपंचायतींना विश्वासात घेऊन गावात आवश्यक असणाऱ्या कामांसाठी सीएसआर निधी खर्च करण्यात येईल. त्यासाठी एक समन्वयक समिती स्थापन करण्यात येऊन त्यात सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच, प्रकल्प अधिकारी यांचा समावेश असेल. |
| १२) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की या परिसरातील कंपन्या मुकुटबनमध्ये विकास कामे करत नाहीत. सक्षम स्थानिक मुले मुली उपलब्ध असताना परप्रांतीयांना संधि देण्यात येते. तरी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती विनंती करण्यात येते की त्यांनी याबाबत प्रकल्प प्रवर्तकांना सूचना करावी, अन्यथा आम्हांला आंदोलन करावे लागेल. | सुचनेची नोंद घेण्यात आली. |

भूसंपादनाबाबत मा. जिल्हाधिकारी जे निर्देश देतील, ते पाळण्यास आम्ही कटीबध्द आहोत.

**६) श्री. सीताराम इंगळे, राहणार अडेगांव, तालुका-झरी जामणी, जिल्हा यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | या परिसरातला जो पाणी ऊपसा होत आहे, पाण्याची पातळी ही फारच कमी होत आहे. लोक नुसते बोअर घेत आहेत, त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी ही खालावली आहे. कंपनी उत्पादनात किती भूगर्भातील पाणी वापरले जाईल हे सांगितले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची ओलितांची संपुर्ण पीके ही नष्ट होणार आहेत. त्याबाबत उपाययोजना. तसेच खदान बंद झाल्यानंतर ती जमिन ज्या शेतकऱ्यांची आहे, त्यांना परत करण्यात यावी ही जिल्हाधिकारी यांना सर्व शेतकऱ्यांमार्फत विनंती करतो. | प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्प सुरु झाल्यानंतर ४१६.० घनमीटर प्रति दिवस भूगर्भातील पाण्याचा ऊपसा होणार आहे. प्रकल्पातील हरित पट्टा संवर्धनासाठी व धूळ दाबण्यासाठी पाणी वापरल्यानंतर शिल्लक राहिलेले पाणी हे आजूबाजूच्या शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यातच येईल. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की खदानचे आयुष्य हे ३९ वर्षाचे आहे. सुरुवातीला कायद्यानुसार ३० वर्षांची मायनिंग लीज मिळत असते. |

भूसंपादनासाठी मा. जिल्हाधिकारी यांनी अर्ज केल्यानंतर तीन वर्षात संपूर्ण भूसंपादन हे करावेच लागते.

७) **<u>श्री. गंगाधर सखाराम कोल्हे, सदस्य, ग्रामपंचायत भेंडाळा, रुईकोट सावळी, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीत प्रत्येक कंपन्या या विविध आश्वासने देतात. नंतर काहीही करत नाहीत. शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्यानंतर १०-१२ लाख फक्त देतात. त्याची जमिन कायमची जाते. आजच्या दराप्रमाणे शेतकऱ्यांना मोबदला देण्यात यावा. जनसुनावणीत आश्वासन दिले जाते की गावातील मुले दत्तक घेऊ. मात्र तसे होत नाही. ज्या ग्राम पंचायतीत हा प्रकल्प आहे, तर ग्रामपंचायत हद्दीतील रस्ते व विकास कामे पूर्ण करण्यात यावी. येथील कंपन्या ओव्हरलोड ट्रक्स भरुन रस्त्यावरुन वाहतुक करत असतात. वाऱ्याने धूळ शेतकऱ्याच्या पीकावर पडते, पीक नष्ट होऊन पीकांचे नुकसान होत आहे. त्यावर उपाययोजना. या प्रकल्पामुळे येथील सुंदर वनसंपदा नष्ट होणार आहे. त्यासाठी काय उपाययोजना करणार, कारण एकदा परवानगी मिळाल्यानंतर कुठलीच कंपनी झाडे लावत नाही. शेतकऱ्यांना चांगला मोबदला मिळालाच पाहिजे, त्यांची फसवणूक होता कामा नये. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की जर नविन मुद्दे असतील तरच ते उपस्थित करावे. त्यांनी प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचना केली की जर जुनेच मुद्दे उपस्थित केल्यास त्यांना उत्तर दिल्याचे सांगण्यात यावे. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की श्री गंगाधर कोल्हे यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची उत्तरे देण्यात आलेली आहेत. आम्हांस स्थानिकांचा रोष दिसत आहे. त्याला काही स्थानिक कारणे असू शकतील. त्यांचे म्हणणे आहे की फक्त जनसुनावणीत फक्त आश्वासन देण्यात येते, नंतर काहीही होत नाही. तर ही जनसुनावणी ही मा.जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होत असून बैठकीचे इतिवृत तयार होत असते. आम्ही दिलेल्या आश्वासनाला बांधिल आहोत. |

**८) श्री. संतोष विठ्ठल घुगेकर, उपसरपंच, भेंडाळा रुईकोट सावली यांच्यावतीने:-**

मी एवढी विनंती करतो की आमच्या भागात ग्रझदानी इंटरनॅशनल प्रा. लिमिटेड ही कंपनी पूर्ण होऊ लागली आहे. गावविकासासाठी काही अटी व मुद्दे आहेत, ते त्यांनी पूर्ण करावेत –

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पात जात आहेत, त्यांना एकरी पन्नास लाख रुपये एवढी किंमत द्यावीत. प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला प्रकल्पात नोकरीसाठी कायमचे घ्यावे. त्यात प्रकल्पग्रस्तातील वारसांना त्यांच्याकडे असलेले कौशल्य तपासून त्यांना नोकरी द्यावी. आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी दवाखाना, जिल्हा परिषद शाळेजवळ वाचनालय बांधून द्यावे. गावातील गरीब मुलांसाठी शाळा व महाविद्यालय यांची व्यवस्था करुन द्यावी. गावातील मुलांसाठी व्यायामासाठी जीमची व्यवस्था करुन द्यावी. कंपनीतील धुरावर नियंत्रण ठेवणे व लोकांची काळजी घेणे, येथे पाण्याच्या टाकीची व्यवस्था करुन द्यावी. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की उपस्थित सर्व मुद्यांवर बैठकीत उत्तरे देण्यात आलेली आहेत. तरीही सीएसआर निधीतंर्गत ज्या योजना पूर्ण करायच्या आहेत, त्याची यादी ग्रामपंचायतीस सादर करण्यात यावी. ग्रामपंचायतीकडून प्रकल्प प्रवर्तकांना यादी आल्यास कंपनीकडून पुढील निर्णय घेण्यात येईल. |

**९) <u>श्री. रमेशराव उदकवार, माजी सरपंच, मुकुटबन, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने मागणी करतो की मालवाहतुकीसाठी मुकुटबनला बाय-पास केल्याशिवाय वाहतुक करु नये. कारण मुकुटबनचा जो रस्ता आहे, तो लोकांचा रस्ता, बाजारातील शेतकऱ्यांचा रस्ता आहे. सर्वांचा एक रस्ता असल्याने बाय-पास पुर्ण झाल्याशिवाय कोणतीही जड वाहतुक करु नये. तरी तोपर्यंत अध्यक्ष महोदयांनी प्रकल्पास परवानगी देऊ नये. त्याचप्रमाणे विविध प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. शेतकऱ्यांची फसवणूक झाली, मोबदलासुध्दा नीट मिळाला नाही. प्रकल्पात नोकरी देण्याचे आश्वासन देऊनही नोकरी | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की उपस्थित मुद्यांवर पूर्वी उत्तर दिले असेल तर तो मुद्दा परत सांगू नये. आपले मुद्दे हे थोडक्यात मांडण्यात यावे. आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांवर प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेली उत्तरे ही बैठकीच्या इतिवृतात समावेश करण्यात येतील. हाच आजच्या बैठकीचा उद्देश आहे. |

| | | |
|---|---|---|
| | देण्यात आलेली नाही, त्यामुळे भूमीपुत्रांना आंदोलन करावे लागते,मोर्चा काढावा लागतो. भूमीपुत्रांना मोकरी न देता परप्रांतीयांना नोकरी दिली जाते. भूमीपुत्रांना जाणीवपुर्वक त्रास दिला जातो. | |
| २) | त्यांनी पुढे सांगितले की शेतकऱ्यांची मागणी आहे की त्यांना एकरी ५० लाख भाव द्यावा व भूमीपुत्रांना कायमस्वरुपी नोकरी द्यावी. शेतकऱ्यांनी हमी पत्र हे जमिन घेतानाच देण्यात यावे. त्याचप्रमाणे शेतातील पीकांवर धूळ पडल्याने पीकांचे नुकसान होते. तरी त्यांना दरवर्षी नुकसानीचा मोबदला देण्यात यावा. तर मा.महोदयांना विनंती करतो की येथे आरोग्य, शिक्षण, स्थानिक मुलांसाठी शैक्षणिक सुविधा, पुस्तके,वह्या, शाळेचा गणवेश तसेच वैद्यकीय तपासणी सोय उपलब्ध करण्यात यावी तरी कंपनीकडून हमीपत्र घेतल्या शिवाय परवानगी देऊ नये ही विनंती. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की श्री उदकराव यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांवर अगोदरच उत्तरे देण्यात आलेली आहेत. त्यांनी वैद्यकीयसुविधा व त्याबाबत विविध शारीरीक तपासण्या संदर्भात मागणी केलेली आहे. प्रकल्प प्रवर्तकांचा स्थानीक वैद्यकीय सेवा ही सशक्त करण्याचा मानस आहे. शैक्षणिक सुविधांबाबत अगोदरच उत्तर देण्यात आलेले असून स्थानिकांना सांगण्यात येते की येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची एक शाळा विकसित करण्यात आलेली असेल. प्रकल्प प्रवर्तक यांनी सूचना केली की सदरहू मागण्या ह्या ग्रामपंचायत कार्यालयातून आल्यास त्याबाबत प्राधान्यक्रम लावता येईल. |

**१०) मी पालक मंत्री संजय राठोड, जिल्हाप्रमुख आकाश राठोड यांचा प्रतिनिधीः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी पालक मंत्री संजय राठोड, जिल्हाप्रमुख आकाश राठोड यांचा प्रतिनिधी म्हणून मुक्काम पोस्ट - मारकी बुद्रुक यांचा प्रतिनिधी. माझ्या तीन सुनावण्या झालेल्या आहेत. तीन्ही सुनावणीत बोललो आहे. मी हजार रुपयांचा स्टँम्प आणून देतो, आजपर्यंत एवढ्या सुनावण्या झाल्या, एकतरी मुद्दा पूर्ण झाला का? | अध्यक्ष यांनी संबधित व्यक्तीस फक्त विषयांवरच बोलण्याची सूचना केली. |
| २) | येथील वृक्षतोड करुन दुसऱ्या जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याच्या धोरणास विरोध आहे. | प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की Compensatory Aforestation बाबत २०२१ ला जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडे अर्ज करण्यात आलेला होता. वन विभागाचे निकष आहेत की त्यांनी हरितपट्टा विकसनासाठी सलग १४८ हेक्टर जमिन लागते. तर यवतमाळ जिल्ह्यात सलग १४८ हेक्टर जमिन |

| | | |
|---|---|---|
| | | ही Compensatory Aforestation नाही. म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील जमिन घेण्यात आली. |

अध्यक्ष यांनी उपस्थितांना परत आवाहन केले की आपल्या सूचना, आक्षेप हे थोडक्यात व मुद्देसुद्द मांडण्यात यावेत. आपल्या प्रत्येक मुद्दयावर प्रकल्प अधिकारी हे उत्तर देणार आहेत.

११) **श्री. मारुती खाडे, राहणार-भेंडाळा, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमची मुले प्रशिक्षणासाठी नागपूरला गेली होती. त्यांनी प्रशिक्षण शिबिर पूर्ण केलेले आहे. तर कंपनी सुरु झाल्यानंतर आमची मुले कामावर रुजु झाली पाहिजेत ही विनंती. | प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की आपल्या मुलाला बेसिक ट्रेनिंग देण्यात आलेले आहे. तर ट्रेनिंग दिलेल्या मुलांना रोजगाराची संधि देण्यास आम्ही कटीबध्द आहोत. आम्हांला स्थानिक मुलांनाच रोजगाराची संधि द्यायची आहे |

१२) **श्री. सत्यनारायण मित्तल, शेतकरी, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या अगोदर विरंगना कंपनीने अगदी कमी भागात जमिनी घेतल्या असून आमची कंपनीने फसवणूक केली.कंपनी चालू होईपर्यंत जमिनीचा ताबा आमच्याकडे राहील, कंपनी चालू झाल्यानंतर आमच्या कुटुंबातील एक व्यक्तीस नोकरी देईल असे त्यांनी आश्वासन दिले. त्यांनी लेखी निवेदन सादर केले. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण पुर्वीच्या विरंगना कंपनीस जमिनी विकल्या आहेत. त्याची रितसर नोंद झालेली आहे. त्या जमिनी भारत सरकारने आम्हांला लीजने दिलेल्या आहेत. तर एकदा कंपनीला विकलेल्या जमिनी आपल्या नावांवर परत करु शकत नाही. |

१३) **श्री. संबा गोविंदा पारधी, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | अध्यक्ष महोदय, येथे आजपर्यंत फक्त सुनावण्या झालेल्या आहेत. शेतकऱ्यांचे नुकसान झाले. भावाबहिर्णीमध्ये झगडा झाला. काहीही फायदा झाला नाही. गेल्या वर्षी उपोषणाला बसलो होतो- इस्पात कंपनीविरुध्द. आमचा कोणताही लाभ झालेला नाही. आम्हांला आश्वासन देण्यात आले की ईसार पावती करण्यात येईल. अजूनही झालेली नाही. आम्ही ३०/१२/२०२२ ला धरणे आंदोलने केली. | त्यावेळी जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की सदरहू बाबत जिल्हाधिकारी कार्यालयात २-३ प्रकारचे अहवाल आहे. याबाबत एकसमान निर्णय (uniform decision) २-३ दिवसात देण्यात येणार आहे. या बैठकीनंतर झरीमध्ये बैठक आहे, त्याठिकाणी तो मुद्दा मांडता येईल. सदरहू बैठक ही प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी असून संबधित प्रकल्पाविषयी जर काही पर्यावरणविषयक सूचना,आक्षेप असल्यास ते नोंदविण्यात यावेत. |

१४) **श्री. विकास बरोकार, राहणार मुकुटबन, तालुका झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | सादरीकरणात सांगितल्याप्रमाणे प्रकल्पासाठी १४६.९९६ हेक्टर वनक्षेत्र तोडावे लागणार असल्याने भरपाई करण्यासाठी वनीकरण (Compensatory Forestation) रातांबे गाव, तालुका-संगमेश्वर, जिल्हा-रत्नागिरी म्हणजे प्रकल्प स्थानापासून ९०० कि.मी. लांब वनीकरण करणात आहेत. एवढ्या लांब वनीकरण करण्याऐवजी खाणीच्या बाजूस एसएलटी आहे, खाणक्षेत्राच्या बाहेर जमिन आहे. ती जमिन वनीकरणासाठी वापरता येईल. येथे वनीकरण न करणे हे येथील जनतेचे नुकसान आहे. कारण प्रकल्पासाठी झाडे कापणार, वनीकरण करणार नाही, त्यामुळे प्रकल्पातील धुळीचा त्रास येथील स्थानिक लोकांना होणार आहे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की रत्नागिरी जिल्ह्यात वनीकरणासाठी जाण्याचे कारण पर्यावरण सल्लागार यांनी विषद केलेले आहे. ज्यावेळी पर्यायी वनीकरणाची पूर्तता करावयाची होती, त्यावेळेस मा. जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती सादर करण्यात आलेली होती. त्यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय यांच्याकडून ही सुविधा खाजगी प्रकल्पांकरिता नसण्याचे सूचविण्यात आले. तरी आम्ही खाजगी जमिन वनीकरणासाठी घ्यावी. नंतर फूड सेक्युरिटी अँक्ट, २०१३ नुसार शेतजमिन अधिग्रहण करण्याचा अधिकाराचे मार्गदर्शन आहे. त्यानुसारच जमिन अधिग्रहित करण्यात यावी, अन्यथा घेऊ नये असे स्पष्टीकरण देण्यात आलेले आहे. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी यांची पूर्वपरवानगी घेण्यात आलेली आहे. येथे बरीच शेती होते. पण शेतीची जमिन वनासाठी घेणे यासाठी सर्वेक्षण |

| | | |
|---|---|---|
| | | करण्यात आले. रातांबे येथील जरी ती शेतजमिन असली, तरी तेथे शेती होऊ शकत नाही, असे रत्नागिरीच्या जिल्हाधिकारी यांनी लेखीस्वरुपात दिलेले आहे. त्याचप्रमाणे निर्देशांनुसार सदरहू भूखंड हा एकमुष्त आहे. |

१५) श्री. श्रीनिवास नारायण चित्तल, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | लिज क्षेत्रातील संपूर्ण जमिनपैकी १२१.३४१ हेक्टर खाजगी जमिन ही एकमुष्त व एक दराने खरेदी झाल्यानंतरच खनन प्रक्रिया चालू करावी. RFCTLARR Act, २०२३ नुसार पाच पट अधिक भाव देऊनच, प्रकल्पग्रस्ताच्या एका वारसदारास नोकरी देऊन, लारा एक्ट लागू करुनच घेण्यात याव्या. शेतकऱ्यांना लारा एक्ट लागू करण्यात यावा. कंपनीने १८ वर्षानंतर खाजगी जमिन खरेदी केल्यास भविष्यात शेतकरी बांधवांचे नुकसान होणार आहे. मध्यस्थांम्रार्फत कंपनी कवडीमोल भावाने जमिनी खरेदी करेल व शेतकऱ्यांचे नुकसान होईल. तरी खाजगी जमिन एकमुष्त व एक दराने केव्हा खरेदी करणार याची माहिती द्यावी. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की RFCTLARR Act, २०१३ अंतर्गत कायद्यास अधीन राहून जमिन अधिग्रहित करण्यात येणार आहे, त्याचे तंतोतंत पालन होईल. |

१६) श्री. सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबाद:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार/ पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी कंपनी प्रशासनाचे अभिनंदन करत आहे. मी पर्यावरणवादी असल्याने फक्त पर्यावरण मुद्दयांवर भाष्य करत आहे. आपल्या पर्यावरण सल्लागाराने जल, हवा, जमिन याचे सर्वेक्षण केलेले आहे. तरी परिसरातील पीकांची सद्यस्थिती, आरोग्यस्थिती व | प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर देताना सांगितले की आपण उपस्थित केलेल्या सूचनांचा आधीच पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समावेश करण्यात आलेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | भूगर्भातील पाण्याची स्थिती याबाबत सर्वेक्षण करण्यात यावे. त्याचा भविष्यात उपयोग होईल. आपली जी जमिन खनन क्षेत्रात जाणार आहे, तेथे पावसाचे पाणी हे सुमारे ३५० कोटी लिटर मिळणार आहे. तरी रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्पात राबविण्यात यावेत. जरी जिल्ह्याबाहेर हरितपट्टा विकसनास परवानगी मिळालेली असली, तरी प्रकल्प क्षेत्रात शक्य असेल तेथे औषधी वनस्पती व फळझाडे लावण्यात यावीत. त्यातप्रमाणे प्रकल्प परिसरातील गावात वृक्षारोपण व रस्त्याच्या दोन्ही बाजूस झाडे लावण्यात यावीत. मी स्थानिक युवक-युवतींना कौशल्यविकास कार्यक्रम हाती घेण्याची सूचना करत आहे. त्यामुळे स्थानिक युवक युवती हे रोजगारक्षम होतील.मी सदरहू योजना अंमलबजावणीसाठी समन्वयक समिती गठित करण्याची शिफारस करत आहे. सदरहू खाणीमुळे देशाचे परकीय चलन वाचणार आहे. मी भारत सरकारला आपणसा परवानगी देण्याची विनंती करतो. | |

१७) श्री. सुधाकर समन्ना कल्लुरा, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रशिक्षण दिलेले सावली, रुईकोट व पारडी येथील युवक दिसत आहेत.मात्र मुकुटबन गावाचे कोणीही दिसत नाही.या बैठकीत सर्व शेतकऱ्यांसमोर जमिनीचा दर घोषित करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की आम्ही रूईकोट ग्रामपंचायतील युवकांना प्रशिक्षण दिलेले असून उर्वरित सर्व ग्रामपंचायत कार्यालयात भेट देऊन तेथील यादी घेऊन तेथील युवकांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम हा घोषित करण्यात येईल.कंपनी प्रशासनाने टप्याटप्याने प्रशिक्षणाबाबत नियोजन केलेले असून त्यानुसार अंमलबजावणी करणार आहे. ज्यांना बेसिक प्रशिक्षण मिळाले, त्यांना पुढील प्रशिक्षण देण्यात येणार आहे. |

१८) श्री. मधुकर राजुरकर, राहणार-लहान पांढरकवडा, पारडी, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमच्या गावातील युवकांना प्रशिक्षण देण्यात यावे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की या विषयावर आताच उत्तर देण्यात आलेले आहे. ही प्रशिक्षणाची पहिली फेज (Phase) आहे. तरी स्थानिक युवकांनी आपली नांवे नोंदवावीत. |

१९) श्री. विलास मंजुरवार, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | भूसंपादन करताना कंपनी दर देईल, पण शासनाचे काय धोरण असेल? प्रकल्पग्रस्तांबाबत शासनाच्या भरतीत शासनाचे काय धोरण आहे? | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही जनसुनावणी पर्यावरणविषयक असून प्रकल्प प्रवर्तक आपल्या प्रश्नास उत्तर देतील.<br>प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की शासकीय धोरणाबाबत आम्ही उत्तर देऊ शकत नाही.<br>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्पग्रस्तांबाबत शासनाचे रोजगाराची संधि देताना जे धोरण आहे, ते असेल. याबाबत कुठलीही विशेष बाब राहणार नाही. येथे प्रकल्पधारक प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण व्यवस्थापन योजना (Environment Management Plan) बाबत बोलणार आहेत. |

२०) श्री. जयंत सोमेश्वर उदकवार, माईनिंग इंजिनियर- मुकुटबन, तालुका-झरीजामनी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | स्थानिक म्हणजे काय, तर स्थानिक म्हणजे महाराष्ट्रातील युवक. जेव्हा आम्ही आंदोलन करतो, तेव्हा सांगितले जाते सर्व महाराष्ट्रातील युवक. २००९ | शासनाने कायद्यातील तरतुदींनुसार जी स्थानिक शब्दाची व्याख्या केलेली आहे, त्यानुसारच रोजगाराची संधी देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | चे शासन आदेश आहेत की ८०% स्थानिक लोकांनाच रोजगाराची संधी देण्यात यावी. या येझदानी कंपनीच्या अगोदर विरंगना कंपनीने उत्खनन सुरु केलेले होते. उत्खनन सुरु केल्यानंतर वनीकरण करण्यासाठी राळेगाव व गारवा या गावात जमिन देण्यात आलेली होती. तर यवतमाळ जिल्ह्यातील वनीकरणाची जागा जिल्हा सोडून रत्नागिरी येथे जाण्याची काय गरज होती? | |
| २) | पुढील मुद्दा या जरी जामनी भागात बऱ्याच कोळशाच्या व मेटल्सच्या खाणी आहेत. तरी आपण प्रथम झरी जामनी तालुक्यातील युवक-युवतींना प्रकल्पातील विविध संवर्गात रोजगाराची संधी देणे आवश्यक आहे. | स्थानिक युवक युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे स्थानिक युवक युवतींना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. |
| ३) | येथे वनविभाग आहे. आपण उत्खनन करताना ब्लास्टींग करणार आहात. ब्लास्टींमुळे व्हायब्रेशन, ध्वनी प्रदूषण होणार. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ब्लास्टींग करताना ध्वनि व व्हाब्रेशन होणार नाही. तर आपण कोणते तंत्रज्ञान वापरणार आहात याचे स्पष्टीकरण करण्यात यावे. | प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ब्लास्टींग करण्यासाठी कंट्रोल ब्लास्टींग करणार असून त्यासाठी डिले डिटोनेटरचा वापर करण्यात येणार आहे. जे फक्त ओव्हरबर्डन काढण्यासाठी राहील. कोळसा उत्खननाकरिता या प्रकल्पात कोळसा सरफेस माईनर तंत्रज्ञान प्रस्तावित आहे ज्यात ड्रीलींग आणि ब्लास्टींगची आवश्यकता नाही. |
| ४) | सीएसआर निधी उत्पादनाच्या २% जिल्हाधिकारी कार्यालयात वर्ग करत असतात. त्याशिवाय आपण निधी ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन गावातील विविध सामाजीक योजनांसाठी म्हणजे आरोग्य सेवा, शिक्षण यासांठी उपलब्ध करण्यात यावा. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की आपण २% सीएसआर निधीच्या व्यतिरिक्त निधी ग्रामपंचायतीस उपलब्ध करुन गावातील विविध सामाजीक योजनांसाठी देणेसंबंधात मुद्दा उपस्थित केला. चर्चेत उत्तर दिलेले आहे की ग्रामपंचायत कार्यालयाशी समन्वय साधूनच योजना राबविण्यात येणार आहेत. कामाची गरज लक्षात घेऊन अतिरिक्त निधी उपलब्धतेबाबत विचार करण्यात येईल. त्यांनी पुढे सांगितले की यवतमाळ जिल्ह्याकडून राळेगाव व गारवा गावात नकार दिल्यानंतरच रत्नागिरी जिल्ह्यात जमिन घेण्यात आलेली आहे. |

२१) श्री. भीमा रेड्डी, माजी सभापती, मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्या रस्त्याने आपण बैठकीस आलो, ते रस्ते पूर्वीच्या कंपनीने तीन लाख घेऊन करारनामा केलेला होता. नंतर स.न.१० हाही कंपनी करारावर घेतला, तो शेतकरी येथे उपस्थित आहे. त्या स.न.१० वर पूर्वीच्या कंपनीने डंपिंग ग्राऊंड केलेले आहेत. पूर्वीच्या कंपनीने शेतकऱ्यांची फसवणूक केलेली आहे, तरी आता शेतकऱ्याची फसवणूक होऊ नये. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आमची खाण अजून सुरु व्हायची आहे. तरी हा प्रश्न लागू होत नाही. |

२२) **<u>श्री. लक्ष्मण भीमण्णा बोंदलवार, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमचे वावर मधात आहे. सर्व बाजूंनी माती टाकलेली आहे. आम्ही मग आता काय करायचे? मी अडाणी आहे. माझी शेती विकत घ्यावी. | सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे. |

२३) **<u>श्री. विठ्ठल शिवाजीराव, भेंडाळा, तालुका-झरी जामणी, जिल्हा- यवतमाळ:-</u>**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ज्याची शेती घेतली जाते, त्यास प्रकल्पात नोकरीस घेण्यात येते. तर जो बेरोजगार आहे, त्याने काय करायचे? मुले भेंडाळ्याची घेत नाहीत. तर मग भेंडाळ्याच्या मुलांनी आत्महत्या करायची का? पाण्याच्या टाक्या बांधून देत नाहीत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रथम आम्ही सर्वांना प्रशिक्षण देणार, नंतर जशी आमची गरज असेल, त्याप्रमाणेच रोजगाराची संधि देण्यात येईल. |

२४) श्री. अमर सातभरे, राहणार-नांदें, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या चारी माईन्स मार्की व मागंली च्या नावाने आहेत, मात्र मार्की मांगली गावाचे १-२% मुलांना प्रकल्पात नोकरी नाही. येथे आयटीआय कॉलेज, विद्यापीठ, महाविद्यालय आहेत. अनेक गरजु व होतकरु मुले आहेत. जर गरजेनुसार कँपस मुलाखाती घेऊन तेथील मुलांना रोजगाराची संधी देण्यात यावी. | प्रकल्प अधिकारी यानी सांगितले की या सूचनेचा निश्चितच विचार करण्यात येईल. |

२५) श्री. संतोष पुरविलवार, मुकूटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी शेतकरी असून मुकुटबनला राहतो. माझी शेती रुईकोट आणि भेंडाळा येथे आहे. मी शेतकऱ्यांच्या बाजूने बोलत आहे. जोपर्यंत ५० लाख रुपये एकरी शेतकऱ्यांची शेती घेत नाहीत, तोपर्यंत कंपनीस परवानगी देऊ नये. आता प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करुन जमिनीचा दर ठरविण्यात येईल. तर हा अधिकार हा आमचा आहे. तरी त्याप्रमाणे पन्नास लाख रुपये एकरी दर ठरवून जमीन घेण्यात याव्यात. त्याचप्रमाणे या जमिनी कधी अधिगृहित करणार हे सांगितलेले नाही. सर्व यादी ही शेतकऱ्यांना मिळालीच पाहिजे. तरी प्रथम जमिनीचा दर पन्नास लाख ठरवूनच नंतर इतर विषय घेण्यात यावे. | प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की बैठकीत बराच वेळा सांगितल्याप्रमाणे जमिनीचा दर ठरविणे हे कंपनीच्या अधिकारकक्षेत येत नाही. मा. जिल्हाधिकारी यांना कायद्यांतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येईल. कायद्यात ज्या तरतुदी असतील, त्यास आम्ही कटीबध्द आहोत. |

२६) श्री. बंडू उर्फ महादेव दामू पारखी,मु.पोस्ट-मार्की बुद्रुक, अध्यक्ष, फार्मर प्रोडयुसर कंपनी, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | सृष्टीवरिल जीवजंतुंना जगण्यासाठी पर्यावरण संवर्धन करणे गरजेचे आहे. पर्यावरणात बदल झाल्यास त्याचा परिणाम मानवी जीवनावर होतोच. प्रकल्प परिसरातील शेतकऱ्यांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे. अशा कंपन्या येऊन जर प्रदूषणामुळे शेतीव्यवसायाबर परिणाम होत असेल,तर प्रदूषण नियंत्रणाचे उपाययोजना करणे गरजेचे आहे. उद्योगाला विरोध नाही. देशात उद्योग आलेच पाहिजेत. त्याचबरोबर शेतीव्यवसाय हा नष्ट झाला नाही पाहिजे. कारण उद्योग व शेती या दोघांची सांगड घातल्याशिवाय देशाची प्रगती होणार नाही. देशाचे दरडोई उत्पन्न वाढविल्यासाठी उदयोगांची गरज आहे. या खाणीच्या उद्योगामुळे पाण्याची पातळी ही कमी होईल. या भागात सिंचनाची जी व्यवस्था आहे, बोअरवेल- त्याचे पाणी कमी होऊ नये म्हणून या प्रकल्प प्रशासनाने दोन शेततळी निर्माण करावीत. एका शेततळ्यात पाणी साठवावे व शेतकऱ्याला ते सिंचनासाठी देण्यात यावे. वृक्षरोपणाच्या संदर्भात बरेच लोक बोललेले आहेत. समान न्याय मिळाला पाहिजे. या कंपनीमुळे शेतक-यांमध्ये भेदभाव निर्माण होत आहे. एका शेतकऱ्याला एक भाव, दुसऱ्या शेतकऱ्याला दुसरा भाव. तरी मा. अध्यक्षांना विनंती आहे की सर्व शेतकऱ्यांना समान भाव दिला पाहिजे. विकास कामासंदर्भात बरीच लोक बोलले आहेत. विकास कामे ही ७३ गावांमध्ये करण्यात यावीत. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री पारखी यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे उपस्थितांनी चर्चिले असून त्याची उत्तरे ही त्या त्या वेळी देण्यात आलेली आहेत.<br><br>पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की श्री पारखी यांनी उपस्थित केलेले सर्व मुद्दे उपस्थितांनी चर्चिले असून त्याची उत्तरे ही त्या त्या वेळी देण्यात आलेली आहेत. उपसा केलेल्या पाण्यावर प्रक्रिया करुनच ते वापरण्यात यावे. तशीच तरतुद करण्यात आलेली आहे. हरित पट्टा विकास योजना आयोजित करण्यात आलेली आहे. वन्यजीव अधिवास योजना वनविभागास सादर करण्यात आलेली आहे. वाहतुक कंत्राटदार याबाबत अहवालात उल्लेख करण्यात आलेला आहे. येथे २५० + ५० जवळपास ३०० लोकांना रोजगार मिळणार आहे. |
| २) | प्रदूषणामुळ शेतकऱ्याच्या पीकाचे नुकसान झाल्यास किती मदत देणार हे जाहिर करावे, | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, शासनाने ठरविल्याप्रमाणे देण्यात येईल. |
| ३) | वन्यजीव संदर्भात बोलायचे झाल्यास वनजमिन या प्रकल्पात जाणार आहे. या भागात वाघ, हरिण, तितर अशी अनेक जंगली जनावरे आहेत. येथून टीपेश्वर हे २० कि.मी. अंतरावर आहे. ही जंगली जनावर वाचली पाहिजेत व त्याचबरोबर जंगली जनावरांमुळे आमच्या पीकांचे मोठे नुकसान होत आहे. डुक्कर नावाचे जंगली जनावर शेतक-याच सर्वात जास्त नुकसान करत आहे. याबाबत काही उपाय योजना करण्यात याव्यात. गावातील सर्वांना आरोग्यसेवा मोफत मिळावी अशी मी विनंती करतो. | प्रकल्प प्रवर्तकाने सांगितले की, याबाबत अभ्यास करण्यात आला होता ज्याची नोंद अहवालात करण्यात आली आहे. याकरिता उपयुक्त वनजीव शमन योजना तयार करून सक्षम अधिकारीच्या अनुमोदन करिता प्रेशित करण्यात आले आहे व त्याची अंमलबजावणी अनुमोदन प्राप्तीनूसार करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ४) | प्रकल्पबाधित लोकांना शिक्षण, आरोग्य, पिण्याचे पाणी, रस्ते या पायाभूत सुविधा दिल्या गेल्या पाहिजे. कोळसा आमचा आहे. प्रकल्प सुरु झाला की आमची विनंती आहे की शेतकऱ्याला कृषिपंपाचा विदयुत पुरवठा हा दिवसा देण्यात यावा. | CSR आणि CER च्या अंतर्गत याचे प्रावधान करण्यात आहे. |
| ५) | प्रकल्प झाल्यानंतर येते कृषि मेळावे घेण्यात यावेत. मी फार्मर प्रोड्युसर संघाचा अध्यक्ष म्हणून सांगेन की याला मी सहकार्य करेन. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ६) | येथून कायर या भागात एक पुरातन मंदिर आहे. मंदीरासाठी विकास फंड द्यावा अशी माझी विनंती आहे. येथील हडकेश्वर हे फार जुने मंदिर आहे. या मंदिरासाठी कंपनीमार्फत विकास कामे करण्याची विनंती करण्यात येत आहे. हे उद्योग आणले तर सकारात्मक कामे करण्यात यावी | ऐतिहासिक स्थळे, प्रार्थनास्थळयाबाबत त्या संबंधित ग्रामपंचायतीकडून प्रस्ताव आल्यास त्याला मंजूरी देण्यात येईल. |

## २७) श्री. निलेश सातपुते, भेंडाळा, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | बैठकीत सांगण्यात आले की स्थानिकांनाच प्रकल्पात प्राधान्य देण्यात येईल. त्यासाठी प्रशिक्षणसुध्दा चालू करण्यात आलेले आहे. मात्र येथील कंपन्यांचा अनुभव वाईट आहे. येथील स्थानिक मुलांना रोजगारासाठी उपोषणास बसावे लागते. तरी प्रकल्प सुरु झाल्यानंतर स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना बोलावू नये ही विनंती. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आम्ही बैठकीत सांगितल्याप्रमाणे प्रकल्प सुरु झाल्यानंतर प्रकल्प परिसरातील ग्रामपंचायत हद्दीतील युवक युवतींना प्रकल्पात रोजगाराची संधि देण्यात येईल. |

## २८) श्री. पंढरी धांडे, राहणार-भेंडाळा, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ:-

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | कोळशाचा प्रकार सांगावा. आम्ही प्रकल्पात काम करतो तर पगार विचारतात. आम्हांला जी.आर.माहित नाही. आम्ही चंद्रपूरच्या लेबर कार्यालयात गेलो होतो. त्यांनी आम्हांला संवर्ग विचारला, आम्हांला माहित नसल्याने सांगता आले नाही. तरी येथील कंपन्या | कोळशाचा प्रकार विचारत असाल, तर कोळशाची गुणवत्ता ही जी ९ आहे. आपला कोळसा हा बिटुमन कोळसा आहे आणि Minimum Wages Act १९४८ आणि |

| | | |
|---|---|---|
| | कमी पगारात काम करुन घेतात. तरी वेतन हे शासकीय आदेश (जी.आर.) प्रमाणे करण्यात यावे. | त्यातील सुधारणा व अधिसूचनाच्या कायद्यनूसार वेतन देण्यात येईल. |

२९) **श्री. आशिष आनंदराव खुलसुंगे, तालुका कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | येथे सर्वांनी मुद्दे मांडले आहेत. येथे चर्चेमध्ये स्थानिक म्हणजे कोण हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. हा देश आपला आहे. तर प्रथम ज्यांच्या जमिनी गेल्या, त्या गावातील प्रकल्पग्रस्तांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. म्हणजे झरी जामनी तालुक्यातील सावली, रुईकोट, मुकुबन आणि पारडी या गावातील लोकांना सर्वात प्रथम प्राधान्य देण्यात यावे. तसेच त्यांच्या शेतावर काम करणारे शेतमजूर त्यांची रोजीरोटी जाणार आहे. त्यांनाही प्राधान्य देण्यात यावे. प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की ४४० लोकांना प्रशिक्षण दिले असून ग्रामपंचायतीच्या सरपंचाकडून यादी मागविणार हा उल्लेख आहे. तर माझी सूचना आहे की सरपंचाच्या ऐवजी ग्रामसभेतून ती यादी घेण्यात यावी, कारण सरपंच राजकीय पक्षाचा असल्याने काही लोकांना घेणार नाही. तरी प्रकल्पग्रस्त चार गावांतील लोक व शेतमजूर हे पहिले घेण्यात यावेत. असेच आश्वासन इस्पात कंपनीने दिले, आता तेथे सर्व परप्रांतीय भरती केलेली आहे. परप्रांतीयांमुळे विनाकारण स्थानीक व परप्रांतीय यांच्यात दुरावा होत आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी श्री खुलसुंगे यांना चांगले प्रश्न विचारले म्हणून धन्यवाद दिले. स्थानिक बाबत केलेल्या सूचनांचे स्वागत. जर मुकुटबन बाय पास असेल व प्रशासनाचे सहकार्य असेल तर आमचेही त्यास सहकार्य राहिल. |
| २) | ज्या दराने जमिन खरेदी करणार, त्या दराने रजिस्ट्री करण्यात यावी, त्यामुळे जमिनीचे शासकीय दर वाढतील. | सूचनेची नोंद घेण्यात आली आहे. |
| ३) | त्यांनी मागणी केली समोरिल रस्ता एकच आहे. त्यावरील वाहतुक ही क्षमतेपेक्षा जास्त आहे. तसेच मुकटबनवासीयांची मागणी आहे की मुकुटबनातून बायपास काढावा. मागच्या वर्षी मुकुटबनमधील एक मुलगा अपघाताने मृत्यू पावला व तेथे मोठे दंगल झाली. तेथील स्थानिकांवर गुन्हे दाखल करण्यात | जर मुकुटबन बायपास असेल व प्रशासनाचे सहकार्य असेल तर आमचे ही त्यास सहकार्य राहील. |

| | | |
|---|---|---|
| | आलेले आहेत. तरी प्रकल्प अधिका-यांनी भरती कशी करणार याची पध्दत विषद करण्यात यावी. | |

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की खाजगी जमिन १२१.३४१ हेक्टर जमिन अधिग्रहित करावयाची आहे.

३०) <u>श्री. विजय अनंतराव पिदूरकर,माजी जिल्हा परिषद सदस्य, ता. जि. यवतमाळ:-</u>

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज मार्की मांगली -२ ची खाणीची जनसुनावणी होत आहे. येथील फिल्ड ग़ाझदानी इंटरनॅशनल प्रा. लि., भूवनेश्वर कंपनीला मिळालेली आहे. कंपनी रुईकोट, मुकुटबन तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळ येथील ३३९.४६७ हेक्टर जमिन अधिगृहित करणार आहात. श्री पिदूरकर यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवालात जमिन अधिग्रहण कायदा, २०१३ च्या नुसार करण्यात येईल असे सांगितले आहे. मात्र पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, २००९ नुसार केंद्र सरकार सांगते की प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष चर्चा करण्यात यावी. कारण रेडी रेकनरचा भाव हा जवळजवळ सहा लाख आहे. तरी त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याला आठ लाख भाव होऊ शकतो. तरी कार्यकारी सारांशमध्ये भारत सरकारचे निर्देश पाळण्यात आलेले नाही. शेतकऱ्यांच्या फायदाच्यी जी योजना आहे,त्यावर आज चर्चा झाली पाहिजे. स्त्री-पुरुष समानता कायद्यानुसार रोजगाराची संधि देणे प्रकल्प प्रवर्तकाकडून अपेक्षित आहे, त्याबाबत धोरण. कार्यकारी सारांश अहवाल व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात ५० टन रस्ता तयार करुन वाहतुक केली जाईल असा कोठेही उल्लेख नाही. मुकुटबन ते वणी स्टेशन पर्यंत ५० टनाची व्यवस्था आपण केलेली नाही. तर त्याची शाश्वती ही दिली पाहिजे. | सूचनेची नोंद घेण्यात आली,<br>श्री पिदूरकरांनी ट्रक्स वाहतुकीबाबत प्रश्न विचारला व ५० टन ट्रक्स वाहतुक करण्याची क्षमता रस्त्यात आहे का याबाबत विचारणा केली. याबाबत बैठकीत चर्चा झालेली असून जर जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेऊन पर्यायी रस्त्याचे नियोजन केल्यास, कंपनी ती व्यवस्था पूर्ण करण्यास सहकार्य करेल.<br><br>प्रकल्पातील धुळीमुळे पिकांचे नुकसान निर्धारित झाल्यास शेतकऱ्यास शासकीय नियमांप्रमाणे मोबदला देण्यात येईल.<br><br>प्रकल्पात स्त्री पुरुष समानतेनुसार रोजगार देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पात वनाची शेती जाणार आहेत, त्यामुळे वनातील जे आदिवासी बांधव आहेत, त्यांचाही रोजगार जाणार आहे. तरी त्या भूमीहिन शेतकरी व आदीवासी बांधव यांच्यासाठी पर्यायी रोजगाराची काय व्यवस्था केलेली आहे याचा उल्लेख अहवालात नाही. | यांच्यासाठी पर्यायी रोजगाराच्या संधीबद्दल अहवालात आधीच नमूद केलेले आहे. |
| ३) | त्यांनी सांगितले की प्रकल्पात २५० रोजगार उत्पन्न होईल असे सांगितले आहे. पण जो सोलर प्रकल्प विकसित करणार त्यात किती रोजगार उत्पन्न होईल याची माहिती दिलेली नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की कार्यकारी सारांश अहवालात पान नं.३ येथे उल्लेख केलेला आहे की प्रकल्पात २५० लोकांना प्रत्यक्ष रोजगार मिळेल. याव्यतिरिक्त अंदाजे ५० लोकांना प्रस्तावित वाळू क्रशिंग व सौर उर्जा प्रकल्पात रोजगार मिळेल. |
| ४) | जनसुनावणीचे अध्यक्ष हे जिल्हादंडधिकारी / न्यायदंडाधिकारी आहेत, तर पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना ही भारत सरकारची आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडल हे महाराष्ट्र शासनाचे अंगिकृत मंडळ आहे, मात्र जनतेस उपलब्ध केलेल्या दोन्ही अहवालात मेळ नाही हे जनसुनावणीच्या दृष्टीने गंभीर व बेकायदेशीर आहे. | कार्यद्याअंतर्गत ही जनसुनावणी घेण्यात येत आहे. |
| ५) | सीएसआर निधी समाजातील विविध सामाजीक कामांमध्ये खर्च करत असताना त्यात समन्वयक म्हणून शैक्षणिक अहर्ता असलेल्या (एम.एस.ड्ब्लु.) स्थानिक व्यक्तीची नियुक्ती कंपनीने करणे गरजेचे आहे. | सूचनेची नोंद घेण्यात आली. सी.एस.आर. निधी खर्च करत असताना त्यात समन्वयक म्हणून शैक्षणिक अर्हता असलेल्या (एम.एस.डब्ल्यु.) स्थानिक व्यक्तिची नियुक्ती कंपनीतर्फे करण्यात येईल. |
| ६) | ईआयए अहवालात सामाजिक सर्वेक्षण करताना स्थानिक रुईकोट, पारडी, मुकुटबन, सावली या गावात विविध शैक्षणिक अहर्ता असलेल्या व्यक्तींचा अभ्यास करणे आवश्यक होते. ते केलेले नाही त्याबाबत खुलासा. | ईआयए अधिसूचनेनुसार सर्वेक्षण करण्यात आलेले आहे |
| ७) | अहवालात सांगण्यात आले की कोळसा डस्टमुळे नुकसान झाल्यास सरकारी संस्थेकडून नुकसान भरपाई देऊ. तरी शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे की कोळसा डस्टमुळे नुकसान झाल्यास कृषि विभाग, तहसीलदार यांची | प्रकल्पातील धुळीमुळे पिकांचे नुकसान निर्धारित झाल्यास शेतकऱ्यास शासकीय नियमांप्रमाणे मोबदला देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आवश्यक आहे की कोळसा डस्टमुळे नुकसान झाल्यास कृषि विभाग, तहसीलदार यांची कायमस्वरुपी समिती जो निर्णय देईल, त्याप्रमाणे मोबदला देण्यात यावा | |
| ८) | वनविभागाची जमिन अधिगृहित करताना तेथील औषधी वनस्ती तोडण्यात येणार आहेत. ती मुल्यवान वनस्पती दुसऱ्या ठिकाणी लावणार का याचाही खुलासा झाला पाहिजे. | येथे श्री पिदूरकर यांनी आक्षेप नोंदविला की आपण जे वनविभागाची जमिन घेणार आहात व जी औषधी मौल्यवान झाडे तोडणार आहात, शक्यतोवर त्याचे प्रत्यारोपण करण्यात येईल. |
| ९) | अहवालात सांगितले आहे की ओ.बी.चे रुपांतर वाळूमध्ये करणार आहेत. त्यासाठी कंपनीने व्यावसायिक (commercial) सर्वेक्षण केलेले आहे का, वाळू निर्मिती झाल्यानंतर होणारे खड्डे बुजविण्यासाठी नदीतील वाळू वापरणार असल्यास त्यास शासनाची परवानगी घेणार का याचे स्पष्टीकरण ईआयए अहवालात व कार्यकारी सारांश अहवालात नाही. ही गंभीर बाब आहे. | प्रकल्पातील ३०% ओ.बी. चे वाळूत रुपांतर करण्यात येईल. तेथे खड्डा पडणार नाही. |
| १०) | कोळसाबरोबरच जे डोलमाईटचे उत्पादन घेणार आहेत, त्याची रॉयल्टी ही District Mining Fund नुसार ग्रामपंचायतीस देण्यात यावी. | प्रकल्पात डोलोमाईट नाही. |
| ११) | पर्यावरण संवर्धनासाठी वड,पिंपळ,करंजा इ. झाडांचा समावेश करणार आहात का. | सूचनेची नोंद घेण्यात आली व या प्रजातींची लागवड अहवालात आधीच प्रस्तावित केलेली आहे. |
| १२) | पर्यावरण निधीबाबत संभ्रम निर्माण करणारा आहे पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात पान नं. ८४ वर १८९ कोटी खर्च दाखविलेला आहे. त्यात other expenses मध्ये खर्चाचे वर्गिकरण नाही. तरी सीईआर निधीबाबत खुलासा करण्यात यावा | पर्यावरण सल्लागार यांनी सीसीआर निधी हा आपण सीईआर निधीबाबत बोलला असे समजतो. त्याचा उल्लेख कार्यकारी सारांश अहवालात पान नं.८ येथे उल्लेख केलेला आहे की २.८५ कोटी रुपये खर्च करण्यात येतील. |

भूमीहिनांसाठी व आदिवासांसाठी कायद्यात जी तरतुद आहे, ती पाळण्यात येईल. पर्यावरण संवर्धनासाठी कडुनिंब, फळझाडे लावण्यात येतील. श्री पिदूरकर यांना सांगण्यात आले की बैठकीचे रेकॉर्डींग होत असून चर्चेतील आश्वासनांचे तंतोतंत पालन करण्यात येईल.

**३१) श्री. वसंत विठ्ठल बाघेला, राहणार-मुकुटबन, तालुका-झरी जामणी, जिल्हा-यवतमाळः-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

३२) <u>श्री. वासुदेव लक्ष्मणराव विधाते, मुक्काम पोस्ट-मार्की मांगली, जिल्हा-यवतमाळ:-</u>
<u>(पहिली वेळ)</u>

बैठकीत खूप लोकांनी त्यांच्या सूचना, आक्षेप नोंदविले आहेत. त्यांच्या हातात कागदपत्रे आहेत व एका हातात माईक आहे. त्यामुळे कागद वाचताना माईकच्या हाताने पान बदलावे लागते. मान्यवरांना जशी सोय केली, तशी सामान्य माणसांसाठी हवी होती, म्हणजे कागदपत्र नीट ठेवता येतील.

अध्यक्ष यांनी बैठकीतील कर्मचारी माईक पकडतील असे सांगितले.

ही जनसुनावणी पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, २००६ नुसार आयोजित करण्यात आलेली आहे. तर येथे त्या अधिसूचनेतील निर्देशांचे उल्लंघन होत आहे. ते थांबविण्यात यावे ही मी अध्यक्षांना विनंती करत आहे.

त्यांनी आक्षेप नोदविला की पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीसोबत लोकप्रतिनिर्धीनी बसणे हे आक्षेपार्य आहे. कारण येथे विविध गावातील विविध पक्षांचे लोक उपस्थित आहेत. त्यांच्यावर विशिष्ट पक्षाच्या लोकप्रतिनिधीचा दबाव येऊ शकतो, त्यामुळे ते आपली मते निर्भयपणे मांडू शकत नाही. हे ईआयए अधिसूचनेचे उल्लंघन आहे. तरीसुध्दा आमदार बसणार असतील तर ही बेकायदेशीर जनसुनावणीत सामान्य जनतेने सामील का व्हावे?

अध्यक्ष यांनी सांगितले तुमच्या आक्षेपांची नोंद घेऊन आमदारसाहेब स्वतः समोर बसत आहेत.

श्री. विधाते यांनी आक्षेप नोंदिवला परिसरातील विविध ग्रामपंचायत कार्यालयात प्रती उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. त्या ओरिजिनल प्रती नसून फोटो कॉपी आहेत. त्या एवढ्या अस्पष्ट आहेत की काहीही वाचता येत नाही. त्यातील नकाशे, अक्षरे, आकडे दिसतच नाहीत. त्यामुळे तो सामान्य लोकांना समजलेलाच नाही. ईआयए अधिसूचनेत public consultation हा महत्वाचा भाग आहे. तर ईआयए अधिसूचनेत जे निर्देश आहेत, त्याप्रमाणेच जनसुनावणी होणे बंधनकारक आहे. हा प्रकल्प काय आहे हा जनतेचा हक्क आहे. तेव्हाच ते प्रस्तावित प्रकल्पामुळे जे पर्यावरणीय संभाव्य परिणाम होणार आहेत, त्याबद्दल मत मांडतील. तर येथे आम्हांला या हक्कापासून वंचित ठेवण्यात आलेले आहे, तर आम्ही सहभाग कसा घेणार?

<u>श्री. विधाते, दुसरी वेळ -</u>

ईआयए अहवाल हा एवढा मोठा पाठविला आहे की एकाला पान धरावी लागतात व दुसरा वाचू शकतो. तरी मा. अध्यक्षांना विनंती आहे की सदरहू जनसुनावणी त्वरित थांबविण्यात यावी.

**श्री. विधाते, दुसरी वेळ -**

ईआयए अहवाल हा एवढा मोठा पाठविला आहे की एकाला पान धरावी लागतात व दुसरा वाचू शकतो. तरी मा. अध्यक्षांना विनंती आहे की सदरहू जनसुनावणी त्वरित थांबविण्यात यावी. सर्व ग्रामपंचायतींना ओरिजनल प्रत, त्यात कलर फोटो, कलर नकाशे घेऊन सर्व ग्रामपंचायतींना दोन भागात पाठविण्यात यावेत, नंतर जनसुनावणी घेण्यात यावी.

पर्यावरण सल्लगार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालाच्या प्रतीबरोबच म्हणजे हार्ड कॉपीबरोबरच सीडी (सॉफ्ट कॉपी) सुध्दा पाठविण्यात आलेली आहे. ईआयए अधिसूचना, २००६ मध्ये कुठेही कलर कॉपीचा उल्लेख नाही. जरी दहा कॉपीज देण्याचे निर्देश असताना आम्ही सव्वीस कॉपीज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत सर्व ग्रामपंचायत कार्यालयांना सादर केलेल्या आहेत. त्याचप्रमाणे निर्देशांप्रमाणेच कार्यकारी सारांश अहवाल हा स्थानिक भाषेत — येते मराठीत व इंग्रजीत उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तरी माझी विनंती आहे की हा अहवाल स्विकारण्यात यावा. इतर सूचना असल्यास त्या देण्यात याव्यात.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीतील सदस्यांना त्यांचे मत देण्याची सूचना केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की महिन्यापूर्वी सर्व ग्रामपंचायतीस ईआयए अहवाल उपलब्ध केल्यानंतर आतापर्यंतच्या क्षणापर्यंत ईआयए अहवाल अस्पष्ट असून वाचता येत नाही अशी तक्रार ही तोंडी. लेखी वा ईमेलव्दारे मप्रनि मंडळ कार्यालयास प्राप्त झालेली नाही.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आतापर्यंत ईआयएबाबत कोणतीच तक्रार प्राप्त झालेली नाही.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सकाळी ११:०० पासून जनसुनावणीचे कामकाच चालू झालेले आहे. त्याचप्रमाणे उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर यांनी १४ एप्रिल, २०२२ रोजी ईआयए अधिसूचना निर्देशांप्रमाणे एका स्थानिक वृत्तपत्रात मराठीत व एका राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये पर्यावरणविषयक जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्याचवेळेस पर्यावरणविषयक आघात मुल्यांकन अहवाल (Environment Impact Assessment Report) अधिसूचित शासकीय कार्यालयात व प्रकल्पबाधित ग्रामपंचायतीत उपलबध करण्यात आलेला होता. दोन्ही सदस्यांकडे अहवाल अस्पष्टेबाबत विचारणा करण्यात आलेली असून त्यांनी एकही आक्षेप नोंदविण्यात आलेला नसल्याची माहिती दिली. प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी त्यांची बाजू मांडली. तर परतही आपण उपस्थित केलेल्या मुद्दयांवर तपासणी करण्यात येईल. मात्र ही जनसुनावणी चालू राहिल. तरी आपणास काही पर्यावरणीय मुद्दे मांडावयाचे असल्यास आपण ते उपस्थित करु शकता.

अध्यक्ष यांनी सांगितले की श्री विधाते यांनी उपस्थित केलेले आक्षेप, त्यास पर्यावरण सल्लागार यांनी दिलेले उत्तर व सदस्य, समन्वयक यांनी दिलेली उत्तरे यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.

अध्यक्ष यानी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

श्री. विधाते यांनी ही निर्णय जनतेवर अन्याय करणारा आहे अशी टिप्पणी केली. या बेकायदेशीर जनसुनावणीमध्ये मी अध्यक्षांना बेकायदेशीर सुनावणी थांबविण्याची विनंती केली. पण त्यांनी ही जनसुनावणी थांबविण्याचा नकार दिला. त्यामुळे हा जनतेवर अन्याय झालेला आहे. जनतेच्या हक्काचे हरण झालेले आहे. तरीपण अध्यक्ष महोदय जिल्हादंडाधिकारी असल्याने मान ठेऊन या बेकायदेशीर जनसुनावणीमध्ये मी सहभागी होऊन माझे मुद्दे मी स्पष्टपणे मांडतो.

त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत आहे.

श्री. विधाते यांनी आक्षेप नोंदविला की हा जो प्रकल्प आहे, हा कोळसा खाण प्रकल्प आहे. प्रकल्पधारकांना सांगितले की या प्रकल्पातील कोळसा ही उर्जा निर्मितीसाठी वापरला जाईल. उर्जा ही देशाची गरज आहे. उर्जेशिवाय देशाचा औद्योगिक विकास होऊ शकत नाही. भारतीय नागरिकांना उर्जेशिवाय जगता येत नाही. म्हणून मोठ्या प्रमाणात उर्जा निर्मिती करणे गरजेचे आहे. ही उर्जेची गरज पूर्ण व्हावी, म्हणून कोळसा खाण प्रस्तावित आहे. कोळसा खाणीस आमचा विरोध का पाठिंबा हा आमचा प्रश्न नाही. कोळसा खाणीमुळे निर्माण होणारे प्रश्न, त्या प्रश्नांशी संबंधित जी इको-सिस्टिम आहे, त्या सर्व इको-सिस्टिमवर या कोळसा खाणीचा परिणाम होतो. दिवसेंदिवस या कोळसाखाणींमुळे इको-सिस्टिमवर परिणाम (disturb) झालेला आहे. वन्यजीवांवर, पाळीव प्राण्यांवर याचा परिणाम होणार आहे. ते आता आपल्याला समोर दिसायला लागले आहेत.

ते परिणाम म्हणजे ईआयए अहवाल, कार्यकारी सारांश अहवाल, पीपीटीमध्ये त्यांनी सांगितले की येथे कुठल्याही प्रकारचा मानव व वाघ याच्यात संघर्ष नाही.

मे, २०१५ ते जून, २०२२ पर्यंत एकूण ३२९ व्याघ्र हल्ले झालेले आहेत. कोणी जखमी झालेले आहेत, काही लोकांचे पाळीव प्राण्यांची हत्या झालेली आहे. जरी त्याचा मोबदला मिळाला, तर या घटना सातत्याने वाढत आहेत. ३२९ घटना या सहा वर्षाच्या कालवधीत झालेल्या आहेत. या घटना वाढत असताना एखादा खाण प्रकल्प जरी या परिसरात येत असेल, तर पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने जी काळजी घेणे आवश्यक आहे, ती घेतली गेली पाहीजे. ती घेण्यासाठीच ईआयए अहवाल तयार करण्यात आलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणार होणारे संभाव्य आघात कमी करता येतील, कसे करता येईल यादृष्टीने तो अहवाल आहे आणि या अहवालात अनेक खोट्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. लोकांची दिशाभूल करणाऱ्या अनेक गोष्टी लिहिलेल्या आहेत.

करण्यात आलेला आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणार होणारे संभाव्य आघात कमी करता येतील, कसे करता येईल यादृष्टीने तो अहवाल आहे आणि या अहवालात अनेक खोट्या गोष्टी सांगितलेल्या आहेत. लोकांची दिशाभूल करणाऱ्या अनेक गोष्टी लिहिलेल्या आहेत.

अ) राखीव वन – १० कि.मी. परिघ – तीन ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारे माहिती दिलेली आहे. पान नं.१५४ – प्रकल्प स्थानापासून दिशा दाखविलेली आहे. प्रकल्पस्थानापासून दिशा व अंतर दाखविलेले आहे – त्यात पवनार, रुईकोट व चिलई राखीव वन दर्शविली आहेत. अर्धवन, आकापूर राखीव वन दाखविली आहेत. नाव नसलेले राखीव वने दर्शविली आहेत.

त्यांनी ३.१ टेबल स्क्रीनवर दर्शविण्याची मागणी केली. त्यात त्यांनी केलेली फसवणूक दिसून येईल. तीन टेबल्समध्ये तीन ठिकाणी वेगवेगळी अंतरे दर्शविली आहेत. त्याचप्रमाणे तीन्ही टेबल्समध्ये दिशाही वेगवेगळ्या दाखविण्यात आलेल्या आहेत. या खोट्या व दिशाभूल करणा-या ईआयए वर पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) तयार केलेला आहे. जर ईआयए चुकीचा आहे,तर आम्ही ईएमपी वर विश्वास कसा ठेवावा?

त्यांनी आक्षेप नोंदविला की येथे सुम्रारे २०,००० हेक्टरपेक्षा जास्त वनक्षेत्र आहे. त्यात ही बफर झोनमध्ये ही सर्व राखीव वने आहेत. कंपनीने चुकीच्या माहितीवर ईएमपी तयार केलेला आहे. यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की कृपया फक्त मुद्दे मांडण्यात यावे. आपला मुद्दा थोडक्यात मांडावा.

त्यावेळी श्री. विधाते यांनी सांगितले की ईआयए अधिसूचनेनुसार जनसुनावणीत कोणीही, कितीही वेळ बोलू शकतो. मी ईआय़ए अहवालाला धरुनच बोलत आहे. त्यामुळे वेळेचे बंधन नाही.

श्री. विधाते यांनी सांगितले की ईआयए मध्ये स्पष्टपणे लिहिले आहे की बफर झोनमध्ये इंटर-स्टेट हद्द नाही. तर आकापूर राखीव वनक्षेत्र हे तेलंगण राज्यात आहे, पैनगंगेच्या पैलतीरावर आहे. येथे बफर झोनमध्ये इंटर-स्टेट हद्द आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विधाते यांना सूचना केली की इतर लोकांनाही बोलायची संधि देणे आवश्यक आहे. तरी आपण आपले म्हणणे पाच मिनिटात संपवावे, नंतर दुस-यांना संधि देण्यात येईल, सर्वांचे बोलणे झाल्यानतर आपणास परत संधि देण्यात येईल, आपण कितीही वेळ बोला.

श्री. विधाते यांनी सांगितले की इंटर स्टेट हद्द असूनही ईआयए मध्ये लिहिलेले नाही.

**३३) डॉ. विराणी, प्राध्यापक, शिवाजी मोटे महाविद्यालय, जिल्हा यवतमाळ:-**

मी शिवाजी मोटे महाविद्यालयात प्राध्यापक आहे, हेड ऑफ डिपार्मेंट आहे व जिल्ह्याचा मानवरक्षक म्हणून नियुक्त आहे.

बऱ्याच वन्यजीव प्रजाती उल्लेखिलेल्या नाहीत. फुलपाख-यांच्या ६०-७० प्रजाती येते आहेत. आपण खूप कमीच दर्शविल्या. तरी आपण कुठली पध्दत वापरली याविषयी माहिती देण्यात यावी.

त्यांनी पुढे सांगितले की येथून उत्तर-पूर्वेला पवनार नावाचे भौगोलिक वनक्षेत्र आहे. तेथे वाघ दिसतात व तेथूनच ते पांगतात. जरी वन खात्याने हे वाघांचे क्षेत्र म्हणून घोषित केले नसले तरीही हा वाघांचा कॉरिडॉर आहे. ताडोबा अंधारी क्षेत्रातला हा पांगणारे क्षेत्र (dispersal area) आहे. याचा कुठेही उल्लेख नाही. तसेच हे वाघ येथे राहतात, ते स्थलांतरीत migratory नाहित. येथून १-१½ कि.मी. अंतर पवनारचे आहे.

त्यांनी पुढे सांगितले की येथे ज्या माईन्स आहेत, त्या एकमेकांच्या बफर क्षेत्रात येतात. त्यामुळे येथे एका माईन्सचा विचार न करता सर्व माईन्स, बफर झोनचा विचार करणे गरजेचे आहे. प्रस्तावित प्रकल्पाचा एकत्रित ईआयए होणे गरजेचे आहे. जर बफर झोन एकमेकात येत असतील, तर एकच ईआयए घेणे योग्य होईल. ईआयएमध्ये बऱ्याच त्रूटी आहेत, तरी त्या दुरुत्या करुन परत जनसुनावणी घेणे आवश्यक आहे. म्हणजे सदरहू एकत्रित प्रकल्प संवर्ग ए मध्ये येईल.

त्यांनी पुढे सांगितले की संवर्धन क्षेत्रात वीस वर्षे काम करत असल्याने बऱ्याच वेळा येत असतो. येथील पवनार जलस्त्रोत व इतर बरेच जलस्त्रोत यांचा येथे उल्लेख नाही. त्या सर्व जलस्त्रोतांवर वाघांचा वावर पाणी पिण्यासाठी आढळलेला आहे. वाघांचे अस्तित्व सातत्याने आढळते. त्यामुळे येथील पाणथळांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. थिसकोन स्पेसीज बाजूला असल्याने येथे सखोल अभ्यास होणे गरजेचे आहे. आम्ही अनुभलेले आहे की येथून वाघ जातात-migration करतात व पुढे वणीला जातात.

त्यांनी पुढे सांगितले की या क्षेत्रात ground water आवश्यक आहे वन्यप्राण्यांसाठी. कारण भूगर्भातील पाणी उपसामुळे परिसरातील micro species/habitat परिणाम होतो. ते घातक आहे, कारण मग प्राण्यांमध्ये संघर्ष सुरु होतो. आपल्याला अवनी वाघीणीबाबतचा प्रसंग आठवतो. ती येथूनच तिकडे गेली होती. मात्र पान नं. २७८ वर लिहिले आहे की येते वन्यजीवासाठी ना हरकत प्रमाणपत्राची गरज नाही. Wild Life Clearance शिवाय हा प्रकल्प होऊच शकत नाही. आपण कित्येक करोडो रुपये वाघांसाठी संवर्धन करतो, मात्र त्याचा अधिवासच येथे आहे. तरी ईआयएमध्ये त्रूटी आढळल्या आहेत, म्हणून त्यात दुरुस्ता करुन परत जनसुनावणी आयोजित करण्यात यावी.

प्रकल्प सल्लागार यांनी डॉ हरदांगा यांचे आभार मानले. त्यांनी सांगितले की Wild Life Conservation Plan बनविलेला आहे. त्यावेळी आक्षेप नोंदविला की अभ्यास हा scanty आहे. आपण फक्त नऊच प्रजाती दर्शविल्या आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आमच्या तज्ञ चमुने येऊन सर्वेक्षण केले व नंतरच अहवाल बनविलेला आहे. त्यांनी जिओ टॅग फोटो सादर केलेले आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी डॉ. विराणी यांना विनंती केली की जर त्यांनी सदरहू माहिती उपलब्ध केली तर त्याची अंतिम अहवालात नोंद घेण्यात येईल. हा प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल असून अंतिम पर्यावरण

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की आमच्या तज्ञ चमुने येऊन सर्वेक्षण केले व नंतरच अहवाल बनविलेला आहे. त्यांनी जिओ टॅग फोटो सादर केलेले आहेत. पर्यावरण सल्लागार यांनी डॉ. विराणी यांना विनंती केली की जर त्यांनी सदरहू माहिती उपलब्ध केली तर त्याची अंतिम अहवालात नोंद घेण्यात येईल. हा प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल असून अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याची नोंद घेण्यात येईल. गरज पडल्यास आम्ही पुन्हा सर्वेक्षण करु व अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात त्याची नोंद घेण्यात येईल.

पर्यावरण सल्लागार यांनी सागितले की पवनार व इतर जलस्त्रोत हेसुध्दा अहवालात नोंदविण्यात येतील. १० कि.मी. परिघातील सर्व पाण्याचे स्त्रोत मार्क करण्यात आलेले आहेत.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की ३ मार्च, २०२३ रोजी Wild Life Conservation Plan सादर करण्यात आले. त्यात टीपेश्वर अभयारण्य, tiger corridor मार्क केलेला आहे. दोन दिवसांपूर्वीच सी.सी.एफ. (Chief Conservator of Forest) येऊन गेले, त्यांचा निर्णय हा अंतिम राहतो.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की फुलपाखूर, पक्षी यांच्या प्रजातींची अहवालात समावेश करण्यात येईल. त्याचप्रमाणे भूगर्भातील पाण्याच्या उपसामुळे होणाऱ्या परिणामांचा उल्लेख अहवालात करण्यात येईल.

डॉ. विराणी यांनी प्रतिपादन केले की येथील सर्व माईन्स एकमेकांच्या बफर झोनमध्ये येतात. तर या सर्व माईन्स एकत्रित करुन पर्यावरण व्यवस्थापन योजना राबवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे याबाबत शासनाने धोरण जाहिर करणे गरजेचे आहेत.

**३४) स्थानिक शेतकरी -**

येथे जे गोरगरिब शेतकरी आले आहेत, त्यांच्या शेती प्रकल्पात गेल्या आहेत किंवा जाणार आहेत. ज्यांच्यावर अन्याय झाला आहे अशी लोक सकाळपासून येथे आलेली आहेत. त्यांना एक मुष्टी त्यांची जमिन घेऊन पन्नाल लाख एकरी जमिन घेण्याची गरज आहे. प्रदूषणामुळे पीकांचे नुकसान झालेले आहे, त्यांना मोबदल्याची गरज आहे. त्यांनी मागणी केली की याच्या अगोदर दोन कंपन्या पळून गेल्या. ही नविन कंपनीसुध्दा कशावरुन पळून जाणार नाही, म्हणून या कंपनीकडून हमीपत्र घेण्यात यावे.

प्रकल्प अधिकारी यांनी उत्तर दिले की सर्व प्रश्नाची उत्तरे देण्यात आलेली आहेत. मात्र त्यांना एक मुद्दा उपस्थित केला की पहिल्या दोन कंपन्या पळून गेल्या, तरी त्या दोन्ही कंपन्या पळून गेलेल्या नाहीत. मा. सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने पहिलेचे ब्लॉक्स रद्द झालेले असून त्यात या ब्लॉकचाही समावेश होता. त्या कंपनीला हा ब्लॉक सोडावा लागला. हा ब्लॉक आमच्या कंपनीने लिलावाव्दारे घेतलेला आहे. त्यामुळे पळून जाण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

त्यांनी आरोप केला की कंपनी एका शेतक-याकडून एक, दुसऱ्याशेतकऱ्यांकडून दुसरा अशी जमिन घेते.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की ही पर्यावरणविषयक जनसुनावणी आहे,

प्रकल्प अधिकारी यांना सांगितले की जमिनीचा दर ठरविण्याचा आम्हांला अधिकार नाही. त्यावेळी काही उपस्थित शेतकरी एकत्रितपणे एकरी पन्नासलाख रुपये देण्याची मागणी केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना शांततेने बसण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की तुमच्या प्रश्नाचे उत्तर मी देणार आहे.

**३५) श्री. राजू मधुकर उंबरकर, महाराष्ट्र नवनिर्माण सेना नेता:-**

येथे शेतकरी आलेले असून त्यांना जनसुनावणीशी काहीही देणेघेणे नाही. त्यांची एकच मागणी आहे की एकरी ५०-६० लाख दर द्यावा व एकमुष्त जमिन घेण्यात यावी, तरच ही जनसुनावणी मंजूर करण्यात येईल. याच्या अगोदरच्या कंपनीने मनमाने भाव घेतला, नंतर वाढवत गेले. तरी कोणती जमीन घेणार, त्याचा सर्व्हे नं. ते आता स्क्रीनवर दाखविण्यात यावे. येथील शेतकऱ्यांची व्यथा वेगळी आहे. मांईन्स सुरु झाली की शेतकऱ्याच्या शेतात जाणे मुश्किल होते. माईन्सचे ओ.बी. आजूबाजूला टाकता, त्यामुळे तेथे पाणी साचते व त्याची जीवनभराची कमाईचे नुकसान होते. अध्यक्ष महोदय, आपण पालक आहात, तरी आपण आमच्या जमिनीची किंमत ठरवावी, तरच ही जनसुनावणी पास करु नाही तर ही जनसुनावणी रद्द असे समजण्यात येईल.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना आवाहन केले की अजूनही कुठल्या शेतकऱ्याला बोलायचे आहे का?

**36 )श्री. राजेश अतरवार, राहणार मुकुटबन, ता. झरी जामणी, जि. यवतमाळ:-**

| अ. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | समजा रुईकोट भाग आहे, तर रेडीरेकनरच्या मार्गदर्शनानुसार त्याला किती मिळतील हे सांगता येईल. त्यामुळे शेतकरी जे आहेत, ते विचार करतील की जमिन द्यायची का नाही द्यायची. कारण उपोषण करुनही कंपनी आमची दखल घेत नाही. येथे मॅप लावला असता, तर प्रत्येक शेतकऱ्याला कळले असते की त्याची शेती किती जाते वा जात नाही. | सादरी करणा दरम्यान या संदर्भात विस्तृत नकाशा व संबंधित गावांचे संपादित होणाऱ्या जमीनीचे क्षेत्रफळ दर्शविण्यात आले होते. |

| | | |
|---|---|---|
| २) | तसेच जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आहे, तो अत्यंत चुकीचा आहे. नकाशे अस्पष्ट, त्यामुळे सामान्य शेतकऱ्याला त्याची कल्पना येत नाही.तसेच जो पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल आहे, तो अत्यंत चुकीचा आहे. नकाशे अस्पष्ट, त्यामुळे सामान्य शेतकऱ्याला त्याची कल्पना येत नाही. | प्रत्येक अहवाला सोबत एक सी.डी. (सॉफ्टकॉपी) संलग्न करण्यात आली होती ज्यात संपूर्ण अहवाल देण्यात आला आहे. |
| ३) | ३९ वर्षाची लीज आहे, म्हणजे कंपनि ३४ वर्षे मायनिंग करणार व पाच वर्षे बंद ठेवणार. तर लारा कायद्यात तरतूद आहे की ती जमिन मूळ मालकाला परत दिली जाईल. तर ही शेती मूळ मालकाल परत मिळेल का हा प्रश्न आहे.तसेच कंपनी क्षेत्रातील बऱ्याच शेत्या या कंपनीने खरेदी केलेल्या नाहीत.त्या शेतकऱ्यांना अडचणीत आणून त्याच्याकडून कमी भावात विकंत घेण्याचा घाट टाकलेला आहे. तसेच मायनिंग क्षेत्रात कंपनीला एकाच वेळी शेत्या विकत घेणे बंधनकारक आहे वा नाही याचीही माहिती शासनाने द्यावी | खनन कार्य खाणकाम बंद झाल्यानंतर च्या कालावधीमध्ये अस्तित्वात असलेल्या कायद्यानूसार करण्यात येईल. |

आज जशी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे, त्याचप्रमाणे फक्त जमिन अधिग्रणबाबतही जनसुनावणी घेण्यात यावी.

प्रकल्प अधिकारी यांनी सांगितले की मान्यवरांनी फक्त जमिन अधिग्रणबाबतही जनसुनावणी घेण्याची सूचना केलेली आहे. तर ती रास्त आहे. कायद्यात तशी तरतुद असून त्यासाठी योग्य वेळी जिल्हा प्रशासनास विनंती करण्यात येईल. उपस्थितांच्या मागणीवरुन प्रकल्प अधिकारी यांनी भूसंपादनाबाबतची जाहिर जनसुनावणी बाबतच माहिती दिली.

**त्यावेळेस स्थानिक शेतकऱ्यांनी मा. अध्यक्षांना मागणी केली की या भूसंपादन जनसुनावणीत कंपनीचा मूळ मालक असला पाहिजे**, त्यात पळवाटा नको. तसेच बाधित ग्रामपंचायतींच्या सरपंचांना विनंती करण्यात आली की त्यांनी ग्रामसभा बोलवावी, कोणतेही ना हरकत प्रमाणपत्र ग्रामसभेच्या परवानगीशिवाय देण्यात येऊ नये अशी सर्व सरपंचांना विनंती करतो.

अध्यक्ष यांनी हा नवीन मुद्द्याची नोंद घेण्यास सांगितली.

अध्यक्ष यांनी सांगितले आज पर्यंत यवतमाळ जिल्ह्यात झालेल्या सर्व जमीन अधिग्रहणे कंपनी स्तरावर करण्यात आलेले आहे. जमीं अधिग्रहण करण्याबाबत व त्या बाबतच्या पध्दती बाबतची जबाबदारी पूर्णपणे खाजगी कंपनीला आहे . त्यामुळे जमीन अधिग्रहण कायदा, 2013 नुसार यापूर्वी यवतमाळ जिल्ह्यामध्ये खाजगी कंपनी करिता जमीन अधिग्रहण बाबत प्रक्रिया करण्यात आलेली नाही. परंतु आज जनसुनावणी मध्ये प्रकल्प प्रवर्तक यांच्या कडून जमिन

अधिग्रहण कायदा, २०१३ जमीन अधिग्रहित करण्यात येईल असे सांगितले जात आहे सदर बाब तपासून घेणे आवश्यक आहे तरी नियमानुसार कायद्यातील तरतुदींची तपासणी करून, खाजगी कंपनीने सादर केलेल्या कागदपत्राची तपासणी करण्यात येईल तसेच विधीमत घेतले जाईल व त्यानंतर नियमानुसार कार्यवाई करता येईल. सदरहू बैठक ही पर्यावरणविषयक असल्याने आपण उपस्थित केलेले सर्व पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल.उपस्थितांकडून वारंवार मुद्दा उपस्थित करण्यात आला व कंपनीने आश्वासन दिले की एकमुष्त जमिन खरेदी करण्यात येईल.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना सांगितले की कायद्यानुसारच ही प्रक्रिंया होणार असल्याने कंपनीस कमी रक्कम देता येणार नाही व जास्तही रक्कम देता येणार नाही.आपण जी जमिनीची रक्कम म्हणता, तेवढी मिळेल असे नाही.जमिनीच्या दराबाबत आता उत्तर देण्यात आलेले असून याबाबतही कितीही वेळी निवेदन स्विकारण्यास जिल्हा प्रशासन नेहमीच तत्पर राहिल. कायद्यानुसारच अंमलबजावणी होण्याची दक्षता घेण्यात येईल.

अध्यक्ष यांनी उपस्थितांना अजूनही काही शंका, प्रश्न असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले.

37)**श्री. चक्रधर व्यंकटेश विकंदीकर,माजी खरेदी-विक्री अध्यक्ष,तालुका झरी जामणी, जि. यवतमाळ:-**

मी २-३ जनसुनावणीला हजर होतो. कंपनी जे बोलते, त्याप्रमाणे अंमलबजावणी करत नाही. काही लोकांना ३-४ लाखपर्यंत तर काही लोकांना २५-३० लाखापर्यंत भाव दिला. तर अशी तफावत का, तर जनतेची मागणी आहे की एकमुष्त भाव दिला पाहिजे. ते या जनसुनावणीत निर्णय झाला पाहिजे. बैठकीत सांगतात रस्त्यावर पाणी मारू, मात्र अंमलबजावणी तशी होत नाही. तरी स्थानिकांच्या समाधानासाठी किमान दर सांगण्यात यावा.

अध्यक्ष यांनी सांगितले की या मुद्यावर गेले १०-१५ वेळा उत्तर देण्यात आलेले आहे. मीसुध्दा ४-५ वेळा उत्तर दिलेले आहे. दुसरा मुद्दा असल्यास तो उपस्थित करण्यात यावा. जे कायद्यात आहे, त्यास कंपनी व जिल्हा प्रशासन बांधिल असून कंपनी आपले निवेदन स्विकारण्यास उपलब्ध आहे.

अध्यक्ष यांनी पुन्हा उपस्थितांना सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की उन्हाळ्याचे दिवस आहेत, वेळेचे बंधन आहे, तरी उपस्थितांनी सूचना, आक्षेप असल्यास ते नोंदवावेत.

**श्री. उंबरकर यांनी सांगितले की** मी बाहेर चाललो होतो, तर मला सर्व शेतकऱ्यांनी परत बोलावले. त्यांनी सांगितले की येथील सर्व शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की जर जमिनीचा दर आज घोषित करणार असाल, तर ही जनसुनावणी आम्हांला मान्य आहे. जर दर घोषित करणार नसाल, तर आम्हांला कोळसा खाण नको, कोळसा खाण आम्हांला मान्य नाही. जनसुनावणीसुध्दा नको. जर दर देता येत नसेल, तर सर्व शेतकऱ्यांना प्रकल्पात भागीदार (Partnership) करुन घ्यावे.

अध्यक्ष यांनी सांगितले की यावर बऱ्याच वेळा उत्तर देण्यात आले असून आपण आता उपस्थित केलेल्या सूचनेची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी परत सांगितले कंपनीने याबाबत सविस्तर उत्तर दिले आहे. कायद्यानुसार व नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल आज पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आहे.

**श्री. विधाते - तिसऱ्या वेळेस बोलण्याची संधी:-**

श्री. विधाते यांनी अध्यक्षांनी शेवटची दहा मिनिटे दिली. श्री.विधाते यांनी सांगितले की एक शेतकरी हिताचा निर्णय सुप्रीम कोर्टाचा निर्णय आलेला आहे. तो निर्णय साधारणतः २०१३ ला आलेला आहे. पण केंद्र व राज्य शासनाने त्याची अंमलबजावणी केलेली नाही. प्रकल्पासाठी जी शेती जाते, त्याच्या दराबाबत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिलेला आहे. Civil Appeal No ४५४० to ४५४८ /२०००. त्यात म्हटले आहे की जमिनीचा हक्क तर आम्हा शेतकऱ्यांचा आहेच, पण शेतकऱ्याच्या७/१२ च्या भूगर्भातील जी खनिजे आहेत, तेसुध्दा शेतकऱ्यांच्याच मालकीची आहेत.ती सरकारच्याही मालकीची नाही.Minerals Rights च्या संदर्भात हा निकाल आहे. या निकालाची अंमलबजावणीसाठी आम्ही वारंवार केंद्र सरकार, राज्य शासन, जिल्हा प्रशासन यांना वारंवार विनंती केलेली आहे. शेतकऱ्याच्या भूगर्भातील करोडो रुपयांचा कोळसा हे घेत आहेत.

अध्यक्ष यांनी श्री. विधाते यांना फक्त मुद्दा उपस्थित करण्याचे आवाहन केले व पाच मिनिटे संपली असून पुढील पाच मिनिटात मुद्दे मांडावेत आणि अजून मुद्दे असतील तर ते लेखी स्वरुपात सादर करण्यात यावे. त्यास प्रकल्प प्रवर्तक लेखी उत्तरे देतील.

श्री. विधाते यांनी अध्यक्ष यांना विनंती केली की या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात यावी. अंमलबजावणी केली नाही, तर शेतकऱ्यांवर अन्याय होईल. सुप्रीम कोर्टाचा अनादर केल्याचा खटला आम्ही सुप्रीम कोर्टात दाखल करु.

श्री. विधाते यांनी सांगितले की अध्यक्ष यांनी सूचना केलेली आहे की पुढच्या पाच मिनिटात माझे बोलणे पूर्ण न झाल्यास पुढचे बोलणे व्हिडिओ शुटिंगव्दारे घेण्यात येईल. माझे बोलणे पाच मिनिटात होणार नसल्याने ही जनसुनावणी पूर्ण होणार नाही, असे माझे स्पष्ट मत आहे.

अध्यक्ष यांनी श्री. विधाते यांना विनंती केली की सकाळी अकरा वाजता बैठक चालू झालेली असून सर्वांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधि देण्यात आली. आता लोकांचाही विचार करुन पाच मिनिटांनी बैठक थांबविण्यात येईल, मात्र आपण व्हिडोओ शुटींगवर आपले म्हणणे मांडू शकता. सूचना, आक्षेप नोंदविताना काही कालावधी दिला जातो, तो आपणास जास्त प्रमाणात दिलेला आहे. मात्र श्री विधाते यांनी ठामपणे मत मांडले की हे ईआयए अधिसूचनेचे उल्लंघन आहे.

अध्यक्ष यांनी श्री. विधाते यांना सांगितले की शेवटची चार मिनिटे आपण बोलून घ्यावे नंतर मी बैठकीस संबोधन करेन.

श्री. विधाते हे परत ईआयए अधिसूचनेचे उल्लंघन होऊ नये, म्हणून दक्षता घेण्याची सूचना देत होते ते म्हणाले ईआयए अधिसूचनेत कोणाला व्यक्तीला किती वेळ द्यावा हे बंधन नाही. जर का

सर्वांना संधी देता येत नसेल, तर दुसऱ्या दिवशी परत बैठक बोलविण्याची तरतुद ईआयए अधिसूचनेत आहे. तरी ही जनसुनावणी बैठक आता थांबवून उद्या परत बोलावू शकतात. कोणालाही त्याचे विचार सांगण्यास वंचित करु शकत नाही. तरी ईआयए अधिसूचनेतील तरतुदींनुसार ही जनसुनावणी उद्या परत बोलविण्यात यावी.

श्री. विधाते यांनी आक्षेप नोंदविला की ईआयए अहवालात बऱ्याच त्रुटी आहेत. इंटर स्टेट हद्द नाही असे सांगतात, मात्र प्रकल्पाच्या बफर झोनमध्ये इंटर स्टेट हद्दआहे. ही ईआयए अहवाल चुकीचा व दिशाभूल करणारा आहे. तरी हा ईआयए परत करायला पाहिजे व नंतर परत जनसुनावणी आयोजित करणे गरजेचे आहे. जल स्त्रोतांचा अभ्यास – पवनार येथील जल स्त्रोतांचा अभ्यास केलेला नाही.

अहवालात खाणीमध्ये प्रत्येक दिवशी चार टन प्रतिदिवस स्फोटके वापरणार आहेत. मात्र त्या स्फोटकाचा साठा फक्त दोन टनांचा आहे. येथे चुकीची व दिशाभूल माहिती आहे. कारण साठा हा चार टनापेक्षा जास्त लागेल.

जमीनीबाबत छोटासा मुद्दा – ज्याच्या जमिनी पूर्वीच अधिग्रहित करण्यात आलेल्या आहेत, तर त्यांना एलएआर प्रमाणे सुविधा पुरविण्यात येतील काय?

पुढील मुद्दा – अहवालात एका ठिकाणी जमिन अधिग्रहण कायद्याप्रमाणे जमिनी अधिग्रहित करणार असे एका ठिकाणी लिहीले, तर दुसऱ्या ठिकाणी जमिनी चर्चेने व सामोपचाराने अधिग्रित करु असे सांगितलेले आहे. हा विरोधाभास आहे. ही शेतकऱ्यांची दिशाभूल आहे.

श्री. विधाते यांनी पुढे आक्षेप नोंदविला की येथील जवळील सबस्टेशनकडून प्रकल्पासाठी वीज घेणार आहेत. शिवाय प्रक्ल्पात सौर उर्जा निर्मिती होणार आहे. पण येथील परिस्थिती अशी आहे की येथील शेतकऱ्यांना फक्त आठ तास वीज मिळते शेतीकामांसाठी. येथे बरेच प्रकल्प आहेत.

यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपणास दहा मिनिटे दिलेली होती, आता सोळा मिनिटे झालेली आहेत. त्याअगोदरही आपण उपस्थित केलेल्या मुद्द्यांची नोंद घेण्यात आलेली आहे. आपणास विनंती करण्यात येते की आपणाजवळ असलेले लेखी निवेदन प्रकल्प प्रबंधकास द्यावे, त्यावर लेखी उत्तर प्रकल्प प्रबंधक हे देतील. सकाळी ११:०० वाजता ही बैठक सुरु झालेली आहे. सर्व शेतकरी बांधवांना विनंती करण्यात आली की त्यांनी मुद्देसुद सूचना, प्रश्न विचारणा करावी. उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिलेले आहे. बैठकीत पुन्हा पुन्हा जमिनीच्या दराबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आले. त्यास प्रकल्प प्रवर्तकांनी व मी बराच वेळा उत्तर देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केलेले आहे. सर्वांच मुद्दे, प्रश्न संपलेले आहेत. अध्यक्ष यानी श्री विधाते यांना लेखी मुद्दे देण्याची विनंती केली. त्या लेखी मुद्यांवर प्रकल्प प्रवर्तकांकडून उत्तर दिले जाईल. जर त्यांना व्हिडओवर सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असल्यास ते नोंदवू शकतात. त्याबाबत समिती नंतर चर्चा करुन इतिवृतात समावेश करायचा वा नाही याबाबत ठरवेल. मात्र श्री. विधाते ईआयए अधिसूचनेचे उल्लंघन झालेले आहे असा सतत

प्रवर्तकांनी व मी बराच वेळा उत्तर देऊन उपस्थितांना मार्गदर्शन केलेले आहे. सर्वांच मुद्दे, प्रश्न संपलेले आहेत. अध्यक्ष यानी श्री विधाते यांना लेखी मुद्दे देण्याची विनंती केली. त्या लेखी मुद्यांवर प्रकल्प प्रवर्तकांकडून उत्तर दिले जाईल. जर त्यांना व्हिडओवर सूचना, आक्षेप नोंदविण्याचे असंल्यास ते नोंदवू शकतात. त्याबाबत समिती नंतर चर्चा करुन इतिवृतात समावेश करायचा वा नाही याबाबत ठरवेल. मात्र श्री. विधाते ईआयए अधिसूचनेचे उल्लंघन झालेले आहे असा सतत आक्षेप नोंदवित होते. त्यावेळी अध्यक्ष यांनी त्यांचे म्हणणे मांडण्याची वेळ झालेली आहे अशी नोंद घेण्याची सूचना केली.

अध्यक्ष यांनी बैठकीचा समारोप करताना सांगितले की सुरवातीस महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जनसुनावणची प्रस्तावना सांगितली, त्यानंतर प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी सादरीकरण केले. त्यानंतर प्रश्न उत्तरे झाली. ही जनसुनावणी पारदर्शक करण्याचा प्रयत्न समितीने केला. त्यासाठी जास्तीतजास्त वेळ दिला, ज्यांना मुद्दे मांडावयाचे आहेत, त्यांना वेळ दिला. त्याचप्रमाणे लेखी सूचना, आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन प्रकल्प प्रवर्तकांना लेखी उत्तर देण्याची सूचना करण्यात आली. बैठकीत जे मुद्दे उपस्थित करण्यात आले, त्या सर्वांची नोंद घेण्यात आलेली असून त्याचा इतिवृतात समावेश करण्यात येईल व ते इतिवृत, सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, लेखी सूचना यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्यातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५ वा माळा, नविन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मादाम कामा रस्ता, मुंबई-४०००३२ येथे सादर करण्यात येतील. तेथील समिती त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष यांनी सर्व उपस्थित शेतकरी, नागरिक, शासकीय कर्मचारी, पोलिस प्रशासन, कंपनी प्रशासन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

सोबत प्राप्त झालेले १७ लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडत आहोत.

| | | |
|---|---|---|
| **(अतुल सातफळे)** | **(अ.मा. करे)** | **(अमोल येडगे, भाप्रसे)** |
| समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा प्रादेशिक अधिकारी, म. प्र. नि. मंडळ, चंद्रपूर | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती तथा जिल्हादंडाधिकारी, यवतमाळ. |